**संदर्भ:**

१. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक: आयटीआय-२०१२/प्र.क्र.९७/व्यशि-३, दि.१४.०६.२०१२
२. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-३३१५/प्र.क्र.१७/व्यशि-३, दि.१४.०५.२०१५
३. कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, शासन निर्णय क्रमांक: बैठक-३४१५/प्र.क्र.२४८/व्यशि-३, दि.०५.११.२०१५
४. कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, शासन निर्णय क्रमांक: पीपीपी-२०१८/प्र.क्र.८९/१८/व्यशि-५, दि.०६.१०.२०१८
५. कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, शासन निर्णय क्रमाकं: समिती-२०२०/प्र.क्र.१२८/व्यशि-३, दि.१६.०७.२०२०
६. कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, शासन निर्णय क्रमाकं: समिती-२०२०/प्र.क्र.१२८/व्यशि-३, दि.२९.०६.२०२१
७. बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५
८. महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र. अमुजा-२०११/प्र.क्र.२१२/का-३, दि.०२.०४.२०१८
९. शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक: औप्रशि-२०१८/प्र.क्र.११०/एस.डी.२, दि.२७.०९.२०१८
१०. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक: सीबीसी-१०/२०१८/प्र.क्र.१३०/मावक, दि. ०७.१२.२०१८
११. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दि.१२.०२.२०१९
१२. THE RIGHTS OF PERSONS WITH DISABILITIES ACT, २०१६
१३. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०१९/प्र.क्र.२२/विशि-३, दि.०९.०७.२०१९
१४. सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दि.२८.०७.२०२०
१५. इतर मागास बहुजन कल्याण विभाग, शासन निर्णय क्र. आयटीआय २०१९/प्र.क्र.६८(भाग-१)/शिक्षण, दि. ०२.०८.२०२१
१६. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, पुरक पत्र क्र: आयटीआय-२०२१/प्र.क्र.१४५/ व्यशा-३,दि. २९जुलै २०२४

---

**१.० सर्वसामान्य:**

प्रस्तुत नियम शिल्पकारागीर प्रशिक्षण योजनेंतर्गत येणाऱ्या व्यवसाय अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी लागू राहतील

अ. महाराष्ट्र राज्यातील सर्व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था

ब. महाराष्ट्र राज्यातील सर्व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था

**१.१ माहितीपुस्तिकेत नमूद संक्षिप्त रुपे:**

| | | |
|---|---|---|
| ARC | : | अर्ज स्विकृती केंद्र |
| CAP | : | केंद्रीय प्रवेश प्रक्रीया |
| CBSE | : | केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ |
| CGPA | : | एकूण श्रेणी बिंदुची सरासरी (Cumulative Grade Point Average) |
| CTS | : | शिल्पकारागीर प्रशिक्षण योजना |
| DGT | : | प्रशिक्षण महासंचालनालय, नवी दिल्ली |
| DVET | : | व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य |
| GoI | : | भारत सरकार |
| GoM | : | महाराष्ट्र सरकार |
| HD | : | मूळ जिल्हा |
| IMC | : | संस्था व्यवस्थापन समिती |
| ITI | : | औद्योगिक प्रशिक्षण संस्था |
| MSBSHSE | : | महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ |
| NCVT | : | राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद |
| NRI | : | अनिवासी भारतीय |
| OHD | : | मूळ जिल्हाबाहय |
| OMS | : | महाराष्ट्र राज्याबाहेरील |
| PIO | : | मूळ भारतीय नागरिक |
| PPP | : | Public Private Partnership |
| SCVT | : | राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषद |
| SL | : | राज्य पातळी |

SSC : माध्यमिक शालांन्त प्रमाणपत्र

१.२ **परिभाषा:**

१.२.१ **औद्योगिक प्रशिक्षण संस्था** म्हणजे शासनामार्फत चालविल्या जाणाऱ्या अथवा शासन मान्यताप्राप्त खाजगी संस्थांद्वारा शिल्पकारागीर प्रशिक्षण योजनेतर्गंत येणाऱ्या व्यवसायांमध्ये प्रशिक्षण देणाऱ्या, राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद अथवा राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषदेची संलग्नता प्राप्त असलेल्या राष्ट्रीय व्यवसाय प्रमाणपत्र अथवा राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषदेचे प्रमाणपत्र निर्गमित करणाऱ्या संस्था.

१.२.२ **शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था** म्हणजे महाराष्ट्र शासनातर्फे चालविल्या जाणाऱ्या औद्योगिक प्रशिक्षण संस्था.

१.२.३ **खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था** म्हणजे खाजगी व्यवस्थापनामार्फत कायम विनाअनुदानित तत्वावर चालविल्या जाणाऱ्या औद्योगिक प्रशिक्षण संस्था

१.२.४ **व्यवसाय/अभ्यासक्रम** म्हणजे प्रशिक्षण महासंचालनालय, नवी दिल्ली किंवा राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र राज्य यांच्यामार्फत सुचित केलेले व्यवसाय/अभ्यासक्रम. येथे व्यवसाय व अभ्यासक्रम एकाच अर्थाने असून त्यांची अदलाबदल होऊ शकते.

१.२.५ **युनिट** म्हणजे विशिष्ट व्यवसाय अभ्यासक्रमाची तुकडी की ज्यासाठी स्वतंत्र शिल्पनिदेशक नियुक्त केला आहे.

१.२.६ **शिल्पनिदेशक** म्हणजे औ.प्र.संस्थांमध्ये शिक्षण/प्रशिक्षण देणारा कर्मचारी

१.२.७ **प्रशिक्षणार्थी** म्हणजे औ.प्र.संस्थेमध्ये प्रवेशित उमेदवार

१.२.८ **प्रशिक्षण वर्ष** म्हणजे औ.प्र.संस्थेमधुन प्रशिक्षण दिले जाणारा ०१ सप्टेंबर ते ३१ ऑगस्ट दरम्यानचा कालावधी

१.२.९ **एनसीव्हीटी** (NCVT) व्यवसाय म्हणजे राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषदेची संलग्नता प्राप्त औ. प्र. संस्थेत शिकविले जाणारे व्यवसाय अभ्यासक्रम

१.२.१० **एससीव्हीटी** (SCVT) व्यवसाय म्हणजे राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषदेची संलग्नता प्राप्त औ.प्र.संस्थेत शिकविले जाणारे व्यवसाय अभ्यासक्रम

१.२.११ **मंजूर प्रवेशक्षमता** म्हणजे प्रशिक्षण महासंचालनालय, नवी दिल्ली यांच्याकडून मंजूर व्यवसाय तसेच राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषदेकडून संलग्नित अभ्यासक्रमनिहाय मंजूर जागांची संख्या किंवा राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषदेच्या अभ्यासक्रमनिहाय मंजूर जागांची संख्या.

१.२.१२ **सुपरन्युमरी** म्हणजे व्यवसाय अभ्याक्रमांच्या तुकडीमधील मंजूर प्रवेशक्षमतेतील गळती रोखण्यासाठी मंजूर प्रवेशक्षमतेच्या ३०% वा प्रशिक्षण महासंचालनालय, नवी दिल्ली यांनी निर्धारीत केल्याप्रमाणे अधिकचे प्रवेश करण्यास दिलेली परवानगी

१.२.१३ **एकूण प्रवेशक्षमता** म्हणजे एका तुकडीची प्रवेशक्षमता = मंजूर जागा म्हणजे मंजूर प्रवेशक्षमता + सुपरन्युमरी

१.२.१४ **राज्य सरकार** म्हणजे महाराष्ट्र राज्याचे सरकार

१.२.१५ **संचालक** म्हणजे **संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य**

१.२.१६ **केंद्रीय प्रवेश प्रक्रीया** म्हणजे शासकीय व खाजगी औ.प्र.संस्थांसाठी एकाच ऑनलाईन अर्जाव्दारे करण्यात येणारी केंद्रीय प्रवेश पध्दत

१.२.१७ **संकेतस्थळ** म्हणजे https://admission.dvet.gov.in

१.२.१८ **प्रवेशअर्ज स्विकृती केंद्र** म्हणजे औ.प्र.संस्था जेथे उमेदवार ऑनलाईन प्रवेश अर्ज भरणे, अर्ज शुल्क जमा करणे व प्रवेश प्रक्रियेसंबंधी इतर सेवा प्राप्त करू शकतो. सर्व शासकीय व खाजगी औ.प्र.संस्था या औ.प्र.संस्थांच्या प्रवेशप्रकीयेत प्रवेश अर्ज स्विकृती केंद्र असतील

१.२.१९ **उमेदवार** म्हणजे महाराष्ट्र राज्यातील शासकीय तसेच खाजगी औ.प्र.संस्थांमधील शिल्पकारागीर प्रशिक्षण योजनेतर्गंत येणाऱ्या व्यवसाय अभ्यासक्रमांसाठी प्रवेश अर्ज शुल्क भरुन ऑनलाईन प्रवेश अर्ज सादर करणारा प्रवेशोच्छुक अर्जदार

१.२.२० **इंटर-से-मेरीट म्हणजे** गुणवत्ता क्रमांक

१.२.२१ सक्षम अधिकारी म्हणजे माहितीपुस्तिकेत उल्लेख केल्याप्रमाणे प्रवेश अर्ज मागविणारा व प्रवेशप्रकीयेची अंमलबजावणी करण्यासाठी शासनामार्फत नियुक्त अधिकारी. सद्यस्थितीत संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांना शासनातर्फे सक्षम प्राधिकारी म्हणून नेमण्यात आले आहे.

१.२.२२ सक्षम अधिकाऱ्याचा प्रतिनिधी म्हणजे प्रवेशप्रकीया सुरळीत पार पाडण्यासाठी सक्षम अधिकाऱ्यास मदतनीस म्हणून सक्षम अधिकाऱ्याकडून नियुक्त अधिकारी

१.२.२३ अनिवासी भारतीय म्हणजे भारतीय आयकर कायदा १९६१ च्या कलम ६ मध्ये दिलेल्या व्याख्येनुसार असणारे.

**१.३ केंद्रीय प्रवेश प्रक्रीया माध्यमातून शिल्पकारागीर प्रशिक्षण योजनेअंतर्गत होणाऱ्या प्रवेश प्रक्रीयेत सक्षम अधिकाऱ्याची भूमिका**

१.३.१ सर्व शासकीय आणि खाजगी औ.प्र.संस्थानी पुढील प्रशिक्षण वर्षाच्या प्रवेशासाठी उपलब्ध व्यवसाय तुकडयांची माहिती संलग्नतेच्या तपशिलासह सक्षम अधिकाऱ्याकडे दिनांक **३१ मार्च** पर्यंत सादर करावीत.

१.३.२ खाजगी औ.प्र.संस्था संस्थास्तरावरील जागा सक्षम अधिकाऱ्याकडे केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेच्या माध्यमातून, भरण्यासाठी **१५ एप्रिल** पर्यंत हस्तांतरीत करु शकतात

१.३.३ अल्पसंख्याक दर्जा प्राप्त खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांनी, आपल्या संस्थेतील उपलब्ध जागांपैकी अल्पसंख्यांकासाठी राखीव आरक्षित जागांची कमाल मर्यादा, केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेच्या माध्यमातून भरण्यासाठी **१५ एप्रिल** पर्यंत सक्षम अधिकाऱ्याकडे सादर करावीत.

१.३.४ सक्षम अधिकारी, सर्व औ.प्र.संस्थांसाठी, औ.प्र.संस्थानिहाय व व्यवसाय अभ्यासक्रमनिहाय प्रवेशक्षमता **१५ एप्रिल** पर्यंत प्रकाशित करतील

१.३.५ सर्व औ.प्र.संस्था पुढील प्रशिक्षण वर्षासाठीची प्रवेशक्षमता तपासतील व काही त्रुटी असल्यास सक्षम अधिकाऱ्यास त्याबाबत **२० एप्रिल** पर्यंत कळवतील.

१.३.६ सक्षम अधिकारी सर्व औ.प्र.संस्थानिहाय व व्यवसाय अभ्यासक्रमनिहाय प्रवेशक्षमता **१ मे** पर्यत प्रकाशित करतील.

१.३.७ **३० एप्रिल** रोजी किंवा त्यापूर्वी राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद अथवा राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषदेकडून संलग्नता प्राप्त व्यवसायांच्या तुकडयांच्या संस्थानिहाय व व्यवसायनिहाय जागांचा त्यांच्या प्रवेश क्षमतेमध्ये/उपलब्ध जागेमध्ये समावेश केला जाईल व सर्व औ.प्र.संस्थांकरिता **१५ मे** पर्यंत व्यवसायनिहाय अंतिम उपलब्ध जागा संकेतस्थळावर जाहीर केल्या जातील. उपरोक्त दिनांकानंतर संलग्नता प्राप्त करुन घेणाऱ्या कोणत्याही व्यवसायाची तुकडी प्रवेशप्रक्रीयेसाठी त्या प्रशिक्षण वर्षात ग्राह्य धरली जाणार नाही.

१.३.८ औ.प्र.संस्थेतील व्यवसाय अभ्यासक्रमांची प्रवेशक्षमतेसह यादी ही प्रवेश पुस्तिकेतील **प्रपत्र-२** म्हणून एक भाग आहे. मात्र, औ.प्र.संस्थेतील सुधारीत व्यवसाय अभ्यासक्रमनिहाय यादी संकेतस्थळावर उपलब्ध असेल. दरम्यान माहितीपुस्तिका अगोदर प्रकाशित झाल्यामुळे सक्षम अधिकारी माहिती पुस्तिकेसोबत प्रपत्र-२ स्वतंत्रपणे पुरवतील.

१.३.९ सक्षम अधिकारी ऑनलाइन प्रवेश संकेतस्थळावर उपलब्ध करतील.

१.३.१० सक्षम अधिकारी औ.प्र.संस्थेतील प्रवेश प्रक्रीयेसाठी माहितीपुस्तिका व प्रवेशासाठी व प्रवेशानंतर करावयाच्या कार्यवाहीसाठी प्रमाणित कार्यपध्दती प्रकाशित करतील.

१.३.११ सक्षम अधिकारी केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेस अनुसरून मिळालेल्या व्यवसायनिहाय जागेवर प्रवेशासाठी व प्रवेश निश्चित करण्यासाठी उमेदवारास जागा मिळालेल्या शासकीय अथवा खाजगी औ.प्र.संस्थेत जाण्यासाठी मार्गदर्शन करेल.

१.३.१२ ऑनलाईन प्रवेश संकेतस्थळावर सर्व औ.प्र.संस्थांना प्रवेश प्रक्रीया पूर्ण करण्यासाठी Login पुरवेल आणि प्रवेशित उमेदवाराची माहिती प्रशिक्षणासाठी व परीक्षेच्या प्रक्रीयेसाठी अग्रेषित करेल.

१.३.१३ सक्षम अधिकाऱ्याने शिल्पकारागीर प्रशिक्षण योजनेअंतर्गत व्यवसायातील प्रवेशासंबंधात घेतलेले सर्व निर्णय अंतिम आणि सर्व संबंधितांना बंधनकारक असतील

१.३.१४ केंद्रीय प्रवेशप्रक्रीया ही **सुचकदर्शी** प्रक्रीया असून सक्षम अधिकारी यात सुधारणा करतील किंवा आवश्यकता असल्यास जास्तीत जास्त प्रवेश होण्याची खात्री करण्यासाठी प्रवेशप्रक्रीयेदरम्यान प्रवेशासंबंधी काही बदल करुन संबंधित माहिती वृतपत्रातून प्रकाशित करतील आणि प्रवेशाच्या संकेतस्थळावर दृश्य स्वरुपात उपलब्ध करुन देतील.

१.३.१५ शासकीय आणि खाजगी औ.प्र.संस्थांमधील प्रवेशित उमेदवारांकडून प्राप्त तक्रार अर्जाबाबत देखील सक्षम अधिकारी तक्रार निवारण अधिकारी म्हणून काम करतील.

१.३.१६ उमेदवारांना प्रवेशप्रक्रीयेसाठी आवश्यक असणाऱ्या दस्तऐवज/प्रमाणपत्रांची यादी माहे मार्च मध्ये संकेतस्थळावर व वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे.

## १.४ केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेसाठी जागांची उपलब्धता:

सक्षम अधिकाऱ्यामार्फत केंद्रीय प्रवेश प्रक्रियेच्या माध्यमातून प्रवेशाकरिता उपलब्ध करुन दिलेल्या जागांचा तपशील खालील तक्त्यात दिला आहे.

| अ.क्र. | संस्था | केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेकरीता सक्षम अधिकाऱ्याकडे उपलब्ध जागा (एकूण प्रवेशक्षमतेच्या प्रत्येक तुकडीसाठी उपलब्ध जागा (टक्केवारी)) | | संस्था स्तरावरील प्रवेशासाठी संस्थेत उपलब्ध जागा (एकूण प्रवेशक्षमतेच्या प्रत्येक तुकडीसाठी उपलब्ध जागा (टक्केवारीत)) |
|---|---|---|---|---|
| | | शासकीय औ.प्र.संस्थांना लागू शुल्क | खाजगी औ.प्र. संस्थांना लागू शुल्क | |
| १ | सर्व शासकीय औ.प्र. संस्था | १००% | ०% | ०% |
| २ | पब्लीक प्रायव्हेट पार्टनरशिप योजनेंतर्गत शासकीय औ.प्र. संस्था | ८०% | २०% | ०% |
| ३ | सर्व खाजगी औ.प्र. संस्था | ०% | ८०% | २०% |

## १.५ केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेसाठी उपलब्ध जागांचे वाटप:

प्रवेश अधिकाऱ्याकडून प्रवेशाकरिता उपलब्ध जागांचे वाटप खाली नमूद केलेल्या तपशीलाप्रमाणे होईल.

| **जागा वाटप** | **प्रवेशाकरिता उपलब्ध जागा** |
|---|---|
| मूळ जिल्हा पातळीवर ९०% जागा (Home District Level) | सर्वसामान्य प्रवेश पध्दतीमध्ये नियम क्र.१.४ नुसार दिलेल्या जागांपैकी ९०% जागा ह्या उमेदवाराने ज्या जिल्ह्यामधून माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (SSC) दिलेली आहे त्याच जिल्ह्यामधील औ.प्र.संस्थेत प्रवेशासाठी उपलब्ध आहेत. |
| जिल्हाबाह्य पातळीवर १०% जागा (Outside Home District Level) | सर्वसामान्य प्रवेश पध्दतीमध्ये नियम क्र.१.४ नुसार दिलेल्या जागांपैकी १०% जागा ह्या महाराष्ट्र राज्यातील उमेदवाराने ज्या जिल्ह्यामधून माध्यमिक शालांन्त प्रमाणपत्र परीक्षा (SSC) दिलेली आहे त्या जिल्ह्याव्यतिरिक्त इतर जिल्ह्यातील औ.प्र.संस्थांमध्ये प्रवेशासाठी आरक्षित ठेवण्यात आल्या आहेत.<br>राज्यस्तरीय गुणवत्ता यादीमधील ज्या उमेदवाराने अशा जिल्ह्याबाहेरील १०% जागांकरिता पर्याय दिला आहे, त्यांना प्रवेश देण्यात येईल. १०% जागांपैकी वरील प्रमाणे प्रवेश देऊन रिक्त असलेल्या जागा, ९०% जागांकरिता पर्याय दिलेल्या उमेदवारांना पुढील फेरीत प्रवेशाकरिता उपलब्ध होतील. |

### १.५.१ मूळ जिल्हा पातळीवरील ९०% जागा:

उमेदवाराने माध्यमिक शालांत परीक्षा (SSC) ज्या ठिकाणावरुन दिलेली आहे त्यावर जिल्हा स्तरावरील ९०% जागांबाबत उमेदवाराची पात्रता ठरविली जाते.

**उदाहरणार्थ:** उमेदवाराने धुळे जिल्ह्यातील माध्यमिक शालांत परीक्षा (SSC) दिलेली असेल तर संबंधित उमेदवार धुळे जिल्ह्यातील सर्व औ.प्र.संस्थांतील उपलब्ध जागांच्या ९०% जागांकरिता पात्र असेल.
मुंबई शहर आणि मुंबई उपनगर जिल्ह्यातील उमेदवाराने कोणत्याही एका जिल्ह्यातून माध्यमिक शालांत परीक्षा (SSC) दिलेली असेल तर उमेदवार मुंबई शहर आणि मुंबई उपनगर जिल्ह्यातील सर्व औ.प्र.संस्थांमधील उपलब्ध जागांच्या ९०% जागांकरिता पात्र असेल. वरील दोन्ही जिल्ह्यांमधील प्रवेशास अर्ज करणाऱ्या उमेदवारांचा मूळ जिल्हा म्हणून मुंबई जिल्हा ग्राहय धरण्यात येईल.

१.५.२ **जिल्हाबाह्य पातळीवरील १०% जागा:**
जिल्हाबाह्य पातळीवरील १०% जागांबाबत, उमेदवाराने ज्या शाळेतून माध्यमिक शालांत परीक्षा (SSC) दिलेली आहे, त्यावरुन उमेदवाराची पात्रता ठरविली जाईल.

**उदाहरणार्थ:** उमेदवाराने माध्यमिक शालांत परीक्षा धुळे जिल्ह्यातून दिलेली असेल तर संबंधित उमेदवार धुळे जिल्हा सोडून इतर सर्व जिल्ह्यामधील सर्व औ.प्र.संस्थांतील उपलब्ध जागांच्या १०% जागांकरिता तो पात्र असेल.

१.५.३ **महाराष्ट्र राज्याबाहेरील व अनिवासी भारतीयांकरिता जागा:**
महाराष्ट्र राज्यातील सर्व शासकीय व खाजगी औ.प्र.संस्थांमधील गुणवत्तेनुसार पात्र उमेदवारांना प्रवेश दिल्यानंतर काही जागा रिक्त राहत असल्यास, अशा जागा महाराष्ट्र राज्याव्यतिरिक्त इतर राज्यातील पात्र उमेदवारांना आणि त्यानंतर अनिवासी भारतीय पात्र उमेदवारांना खाली नमूद केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार प्रवेशास देण्यात येतील.

१.५.३.१ महाराष्ट्र राज्याबाहेरील व अनिवासी भारतीय अशा सर्व उमेदवारांना खुल्या प्रवर्गात ग्राह्य धरण्यात येईल व त्यांना **नियम क्र. २.०** मध्ये नमूद केल्याप्रमाणे पात्रता धारण करणे आवश्यक आहे.

१.५.३.२ महाराष्ट्र राज्याबाहेरील आणि अनिवासी भारतीय उमेदवारांना अनुक्रमे त्यांच्या गुणवत्ता क्रमानुसार प्रवेश दिला जाईल.

१.५.३.३ महाराष्ट्र राज्यातील उमेदवारांमधून जागा भरल्यानंतर, सक्षम अधिकारी या श्रेणी मधील उमेदवारांमधून चौथ्या फेरीमध्ये जागा वाटप करतील.

१.५.३.४ प्रथम राज्याबाहेरील उमेदवारांमधून जागा भरण्यात येतील, त्यानंतर जागा रिक्त राहिल्यास अनिवासी भारतीय उमेदवारांमधून जागा भरण्यात येतील.

१.५.३.५ नियमित वेळापत्रकाप्रमाणे महाराष्ट्र राज्याबाहेरील आणि अनिवासी भारतीय उमेदवारांना केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेत नोंद करावी लागेल आणि वेळापत्रकामध्ये दिल्याप्रमाणे चौथ्या फेरीसाठी पर्याय सादर करावे लागतील.

१.५.३.६ महाराष्ट्र राज्याबाहेरील व अनिवासी भारतीय उमेदवार केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेच्या पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या फेरीसाठी पात्र नाहीत.

१.६ **औ.प्र. संस्थामधील जागा वाटप आणि आरक्षण:**

केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेनुसार प्रवेशाकरिता उपलब्ध असलेल्या जागांची आणि संस्था स्तरावर उपलब्ध असलेल्या जागांची सर्व प्रकारच्या संस्थांमधील वर्गवारी खाली दर्शविल्याप्रमाणे आहे.

| अ.क्र. | संस्थेचे प्रकार | सक्षम अधिकाऱ्याकडे उपलब्ध जागा (एकूण प्रवेशक्षमतेच्या टक्केवारीत) | | | संस्था पातळी वरील जागा @ (एकूण प्रवेशक्षमतेच्या टक्केवारीत) |
|---|---|---|---|---|---|
| | | मूळ जिल्हा पातळीवरील जागा | जिल्हाबाह्य पातळीवरील जागा | राज्यपातळीवरील जागा | |
| १. | शासकीय औ. प्र. संस्था सर्वसामान्य | ९०% | १०% | ०% | ०% |
| २. | शासकीय औ. प्र. संस्था महिला | ०% | ०% | १००% - फक्त महिलांसाठी | ०% |
| ३. | शासकीय औ. प्र. संस्था अल्पसंख्यांकाकरिता | अल्पसंख्यांका व्यतिरिक्त उपलब्ध ३०% जागांच्या ९०% | अल्पसंख्यांका व्यतिरिक्त उपलब्ध ३०% जागांच्या १०% जागा | ७०% - फक्त अल्पसंख्याकाकरिता | ०% |
| ४. | शासकीय औ. प्र. संस्था - अनुसूचित जाती करिता (SCP) | अनुसूचित जाती व्यतिरिक्त उपलब्ध २०% जागांच्या ९०% | अनुसूचित जाती व्यतिरिक्त उपलब्ध २०% जागांच्या १०% जागा | ८०% - फक्त अनुसूचित जातीकरिता | ०% |
| ५. | शासकीय औ. प्र. संस्था - अनुसूचित जमाती करिता (TSP) | अनुसूचित जमाती व्यतिरिक्त उपलब्ध २५% जागांच्या ९०% | अनुसूचित जमाती व्यतिरिक्त उपलब्ध २५% जागांच्या १०% जागा | ७५% फक्त अनुसूचित जमातीकरिता | ०% |
| ६. | शासकीय औ. प्र. संस्था - सार्वत्रिकरण | अनुसूचित जमाती व्यतिरिक्त उपलब्ध ००% जागांच्या ९०% | अनुसूचित जमाती व्यतिरिक्त उपलब्ध ००% जागांच्या १०% जागा | १००% फक्त अनुसूचित जमातीकरिता | ०% |
| ७. | शासकीय औ.प्र. संस्था - LWE$ | १००% | ०% | ०% | नक्षली चळवळीतून शरण आलेल्या युवक-युवतींना प्रथम प्राधान्याने संस्थास्तरावर प्रवेश |
| ८. | खाजगी औ. प्र. संस्था सर्वसामान्य | एकूण प्रवेश क्षमतेच्या उपलब्ध ८०% जागेच्या ९०% | एकूण प्रवेश क्षमतेच्या उपलब्ध ८०%जागेच्या १०% जागा | ०% | एकूण प्रवेशक्षमतेच्या २०% |
| ९. | खाजगी औ.प्र. संस्था - अल्पसंख्यांकाकरिता # | केंद्रीय प्रवेश पध्दतीतील उपलब्ध जागांच्या ९०% जागा * | केंद्रीय प्रवेश पध्दतीतील उपलब्ध जागांच्या १०% जागा* | किमान मर्यादा ५०% फक्त विशेष अल्पसंख्यांकासाठी | कमाल मर्यादा २०% |
| १०. | शासकीय औ. प्र. संस्था - पब्लीक प्रायव्हेट पार्टनरशिप योजनेंतर्गत | ७२% | ०८% | २०% | ०% |

\# ज्या खाजगी औ.प्र.संस्थांची अल्पसंख्यांक संस्था म्हणून नोंद आहे अशा संस्था सक्षम अधिकाऱ्यांना केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेतील उपलब्ध जागांमध्ये अल्पसंख्यांक उमेदवारांना असलेल्या आरक्षणाच्या कमाल मर्यादेबाबत १५ एप्रिल पूर्वी कळवतील.

* केंद्रीय प्रवेश पध्दतीतील जागा = एकूण प्रवेशक्षमता - (राज्य स्तरावर विशिष्ट अल्पसंख्यांकाकरिता असलेल्या जागा + संस्था पातळीवरील जागा) केंद्रीय प्रवेश पध्दतीत जागा हया एकूण प्रवेशक्षमतेच्या १००% पेक्षा जास्त असू नयेत.

$ नक्षली चळवळीतून शरण आलेल्या युवक-युवतींना संस्थास्तरावर प्रथम प्राधान्याने प्रवेश देण्यात येतील.

@ खाजगी औ.प्र.संस्था, संस्था पातळीवरील जागा केंद्रीय प्रवेश पध्दतीद्वारे भरण्यासाठी सक्षम अधिकाऱ्याकडे देऊ शकतात. तथापि, अशी विनंती १५ एप्रिल पूर्वी करण्यात यावी.

**२.० शिल्प कारागीर प्रशिक्षण योजनेअंतर्गत व्यवसायांच्या प्रवेशाकरिता पात्रता निकष:**

२.१ उमेदवार भारतीय नागरिक असावा

२.२ उमेदवाराने त्याप्रवेश वर्षात दि. ३१ जुलै रोजी वा तत्पूर्वी वयाची १४ वर्षे पूर्ण केलेली असावी. तथापि, प्रशिक्षण महासंचालनालय, नवी दिल्ली यांनी काही विशिष्ट व्यवसाय अभ्यासक्रमांसाठी किमान वयोमर्यादा निर्धारित केल्यास त्याप्रमाणे व्यवसाय निहाय किमान वय पात्रतेत बदल करण्यात येईल.

२.३ कोणत्याही व्यवसायाच्या प्रवेशाकरिता कमाल वयोमर्यादेची अट नाही.

२.४ व्यवसायनिहाय पात्रतेसाठी उमेदवाराने **प्रपत्र - १** चा संदर्भ घ्यावा.

२.५ राष्ट्रीय मुक्त शाळेतील विज्ञान व गणित हा विषय नसलेले उमेदवार व अपंग शाळेतील उमेदवार अभियांत्रिकी व्यवसायासाठी पात्र नाहीत. अभियांत्रिकी व बिगर अभियांत्रिकी व्यवसायाच्या वर्गवारीसाठी **प्रपत्र - १** चा संदर्भ घ्यावा.

२.६ उमेदवाराचे निकालपत्र श्रेणीस्वरुपात (Grade System) असल्यास, अशा उमेदवारांनी श्रेणी व गुण यांची समकक्षता असलेले संबंधित मंडळाचे अधिकृत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

२.७ उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (SSC) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळ किंवा केंद्रीय परीक्षा मंडळाव्यतिरिक्त अन्य मंडळाकडून उत्तीर्ण झाला असेल तर त्याने महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाकडून (MSBSHSE) तसे समकक्षता प्रमाणपत्र आणावे.

२.८ अनिवासी भारतीय उमेदवारांनीही महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाचे (MSBSHSE) असे समकक्षता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

**३.० उमेदवारांचे प्रकार:**

**३.१ महाराष्ट्र राज्यातील उमेदवार व मूळ जिल्ह्यातील उमेदवारांचे प्रकार:**

सक्षम अधिकाऱ्याच्या अखत्यारीतील महाराष्ट्र राज्यातील जागांवर प्रवेशाकरिता उमेदवारास खालील तक्त्यांमधील एकातरी पात्रतेच्या निकषाची पूर्तता करणे आवश्यक आहे.

| अ. क्र. | उमेदवाराचे प्रकार | जिल्हा स्तरावरील ९०% जागांकरिता उमेदवाराचे पात्रता व जिल्हाक्षेत्र निकष | मूळ जिल्हा |
|---|---|---|---|
| १. | **प्रकार - अ**<br>महाराष्ट्र राज्यातील उमेदवार<br>Type - A<br>Maharashtra State Candidates | उमेदवाराने महाराष्ट्र राज्यातील मान्यताप्राप्त शाळेतून माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (SSC) दिलेली असावी<br>आणि<br>उमेदवाराचे आई अथवा वडील महाराष्ट्र राज्याचे अधिवास असणारे असावेत. | उमेदवाराचा मूळ जिल्हा म्हणजे उमेदवाराने माध्यमिक शालांन्त प्रमाणपत्र परीक्षा (SSC) जेथून दिलेली असेल ते ठिकाण ज्या जिल्हा क्षेत्रात येते, तो जिल्हा. |
| २. | **प्रकार - ब**<br>महाराष्ट्रात अधिवास असणारे उमेदवार<br>Type - B<br>Maharashtra Domiciled Candidates | "प्रकार - अ" ची पूर्तता करीत नसल्यास<br>आणि<br>उमेदवाराचे आई अथवा वडील महाराष्ट्र राज्याचे अधिवास असणारे असावेत. | उमेदवाराचा मूळ जिल्हा म्हणजे महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र देणारे प्राधिकरण महाराष्ट्र राज्यातील ज्या जिल्हा क्षेत्रात येते, तो जिल्हा. |
| ३. | **प्रकार - क**<br>केंद्र शासन अथवा केंद्र शासनाच्या उपक्रमामधील कर्मचाऱ्याचा मुलगा / मुलगी<br>Type - C<br>Sons and Daughters of Central Govt./ Govt. of India Undertaking Employee | “प्रकार - ब” ची पूर्तता करीत नसल्यास<br>आणि<br>अर्ज भरण्याच्या अंतिम मुदतीपूर्वी ज्या उमेदवाराचे आई/वडील केंद्र शासनाचे / केंद्रशासनाच्या उपक्रमामधील कर्मचारी असून ज्यांची नियुक्ती महाराष्ट्र राज्यात झाली आहे आणि जे पदावर रुजु झाले आहेत. | उमेदवाराचा मूळ जिल्हा म्हणजे महाराष्ट्र राज्यातील ज्या जिल्ह्याच्या कार्यकक्षेत उमेदवाराचे आई/वडील हे केंद्र शासनाचे/केंद्र शासनाच्या उपक्रमामधील कर्मचारी असून त्यांची नियुक्ती झालेली आहे व ते रुजू झालेले आहेत असा जिल्हा. |

| अ. क्र. | उमेदवाराचे प्रकार | जिल्हा स्तरावरील ९०% जागांकरिता उमेदवाराचे पात्रता व जिल्हाक्षेत्र निकष | मूळ जिल्हा |
|---|---|---|---|
| ४. | **प्रकार - ड**<br>महाराष्ट्र राज्य शासन अथवा महाराष्ट्र राज्य शासनाच्या उपक्रमामधील कर्मचाऱ्याचा मुलगा/मुलगी<br>Type - D<br>Sons and Daughters of Maharashtra State Govt./ Maharashtra State Govt. Undertaking Employee | "प्रकार - क" प्रमाणे पूर्तता करीत नसल्यास<br>आणि<br>उमेदवाराचे आई/वडील हे महाराष्ट्र राज्य शासन/महाराष्ट्र राज्य शासनाच्या उपक्रमामधील कर्मचारी आहेत. | उमेदवाराचा मूळ जिल्हा म्हणजे महाराष्ट्र राज्याच्या कार्यकक्षेत उमेदवाराच्या आई/वडीलांची नियुक्ती महाराष्ट्र राज्य शासन/महाराष्ट्र राज्य शासनाच्या उपक्रमामधील कार्यालयात/मुख्यालयात झाली असेल असा जिल्हा |
| ५ | **प्रकार - इ**<br>महाराष्ट्र राज्यातील उमेदवार महाराष्ट्र राज्य शासन/महाराष्ट्र राज्य शासनाच्या उपक्रमामधील/केंद्र शासन/ केंद्र शासनाच्या उपक्रमामधील कर्मचारी ज्यांची बदली दुसऱ्या जिल्ह्यात झालेली आहे अशा उमेदवाराची आई/वडील यांची नियुक्ती झालेल्या जिल्ह्यात जाण्याची इच्छा आहे.<br>Type - E<br>Maharashtra State Candidate, Sons & Daughters of Maharashtra State Govt. /Maharashtra State Govt. Undertaking/Central Govt./Govt. of India Undertaking Employee who is transferred to a place in another District and the Candidate intends to shift to the District where the Father/Mother is posted | महाराष्ट्र राज्यातील मान्यता प्राप्त शाळेतून इ.८ वी, ९ वी व १० वी परीक्षा दिलेले उमेदवार<br>आणि<br>ज्या जिल्ह्यातून उमेदवाराने माध्यमिक शालांन्त प्रमाणपत्र परीक्षा (SSC) दिलेली आहे तेथून दुसऱ्या जिल्ह्यात उमेदवाराचे आई/वडील जे महाराष्ट्र राज्य शासन/महाराष्ट्र राज्य शासनाच्या उपक्रमामधील/केंद्र शासन/केंद्र शासनाच्या उपक्रमामधील कर्मचारी असून त्यांची अर्ज स्वीकृतीच्या अंतिम मुदतीपूर्वी बदली झालेली आहे व ते रुजू झालेले आहेत असा जिल्हा. | उमेदवाराचा मूळ जिल्हा म्हणजे महाराष्ट्र राज्यातील ज्या जिल्ह्याच्या कार्यकक्षेत उमेदवाराच्या पालकांची नियुक्ती झालेली आहे की जे राज्य शासन/महाराष्ट्र राज्य शासनाच्या उपक्रमामधील/केंद्र शासन/केंद्र शासनाच्या उपक्रमामधील कर्मचारी.<br><br>**टीप:** प्रकार - इ चा पर्याय निवडणारा उमेदवार प्रकार अ ची संधी गमावेल. जर एखाद्या उमेदवाराने प्रकार अ आणि इ दोन्हीकरिता अर्ज केला असेल तर त्याचा/ तिचा प्रकार इ वर हक्क राहून त्यानुसार अर्जाचा मूळ जिल्ह्याच्या गुणवत्ता यादीनुसार विचार केला जाईल. |

३.२ **महाराष्ट्र राज्याबाहेरील उमेदवार:**
महाराष्ट्र राज्याबाहेरील उमेदवार भारतीय नागरिक असला पाहिजे जो की नियम ३.१ मधील अनुक्रमे १,२,३,४ आणि ५ म्हणजेच प्रकार अ, ब ,क, ड आणि इ ची पूर्तता करीत नाही आणि जे देशातील महाराष्ट्र राज्याबाहेरील इतर संस्था अथवा शाळेतून माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (SSC) दिलेली आहेत.

३.३ **अनिवासी भारतीय उमेदवार:**
आयकर कायदा १९६१ मधील विभाग ६ मध्ये नमूद केलेल्या परिभाषेप्रमाणे असणारे उमेदवार.

## ४.० चालू प्रशिक्षण वर्षामध्ये शिल्प कारागीर प्रशिक्षण योजने अंतर्गत व्यवसायांचा प्रथम वर्ष पुनर्प्रवेश/नवीन प्रवेश घेऊ इच्छिणारे उमेदवार:

४.१ ज्या उमेदवाराने मागील प्रशिक्षण वर्षात औ.प्र. संस्थामधून कोणत्याही अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेला असेल, तो उमेदवार चालू वर्षात प्रथम वर्षाच्या अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यासाठी पात्र आहे. तथापि, त्यांना मागील प्रशिक्षण वर्षात पास झालेल्या कोणत्याही विषयात सवलत देण्यात येणार नाही. अशा उमेदवारांना सक्षम अधिकाऱ्याने सूचित केलेल्या नमुन्याप्रमाणे पुढील प्रवेशासाठी पूर्वी प्रवेश घेतलेल्या संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

४.२ ज्या प्रशिक्षणार्थ्यांनी औ.प्र. संस्थेत अंतिम वर्षाची परिक्षा दिलेली असेल व त्या परिक्षेचा निकाल घोषित झाला असेल असेच प्रशिक्षणार्थी पुनर्प्रवेशास पात्र असतील.

४.३ असे पुनर्प्रवेश घेतलेले उमेदवार कोणत्याही प्रकारची शासकीय शिष्यवृत्ती, निर्वाहभत्ता, प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना वा इतर सुविधेसाठी पात्र राहणार नाहीत. तसेच अशा उमेदवारांना प्रशिक्षण शुल्कात कोणतीही सवलत दिली जाणार नाही.

५.० **आरक्षण:**

सक्षम अधिकरणाच्या कक्षेमध्ये सामान्य प्रवेश पध्दती अंतर्गत उपलब्ध जागांकरिता विविध प्रकारच्या आरक्षणाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

५.१ **दिव्यांग असलेल्या उमेदवारांकरिता आरक्षण:**

५.३.१ The Rights of Persons with Disabilities Act, २०१६ (No. ४९ of २०१६) तरतुदींच्या अनुषंगाने केंद्रीय प्रवेश पध्दती अंतर्गत उपलब्ध जागांच्या ५% जागा प्रत्येक औ.प्र.संस्थामध्ये अपंग उमेदवारांना आरक्षित असतील.

५.३.२ खाली दिलेल्या प्रकाराप्रमाणे हे आरक्षण अपंग उमेदवारांना लागू होईल.

| अ.क्र. | दिव्यांगत्वाचे प्रकार | तपशील |
|---|---|---|
| १. | PWD - १ | Blindness and low vision |
| २. | PWD - २ | Deaf and hard of hearing |
| ३. | PWD - ३ | Locomotor disability including cerebral palsy, leprosy cured, dwarfism, acid attack victims and muscular dystrophy |
| ४. | PWD - ४ | autism, intellectual disability, specific learning disability and mental illness |
| ५. | PWD - ५ | Multiple disabilities from amongst persons under clauses PWD - १ to PWD - ५ |

५.३.३ शिल्प कारागीर प्रशिक्षण योजनेतील व्यवसायांचे प्रशिक्षण हे प्रात्यक्षिकाभिमुख असल्यामुळे अपंग वर्गातील उमेदवारांकरिता व्यवसायानुरुप पात्रता **प्रपत्र - १** मध्ये दिलेली आहे.

५.३.४ दिव्यांग उमेदवारांना त्यांच्या शारिरीक दिव्यांगत्वाच्या प्रकारानुसार पात्र असलेल्या व तयार करण्यात आलेल्या गुणवत्ता यादीप्रमाणे ५% जागा आरक्षित ठेवण्यात येतील. मूळ जिल्ह्यासाठी असणाऱ्या जागांसाठीच या जागांचे वाटप होईल. प्रत्येक दिव्यांग वर्गवारीला १.०% देणे आवश्यक आहे (सर्वसामान्य दिव्यांगासाठी राखीव असणाऱ्या जागांसाठी एकच गुणवत्ता यादीनुसार प्रवेश समर्थनीय नाही)

५.३.५ दिव्यांग उमेदवाराला शिल्प कारागीर प्रशिक्षण योजनेंतर्गत व्यवसायाला प्रवेश मिळाल्यानंतर प्रशिक्षण कार्यक्रमात कोणतीही सूट/अधिक सुविधा दिल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

५.३.६ दिव्यांग उमेदवाराला शैक्षणिक पात्रतेत सूट मिळणार नाही.

५.३.७ अपंगाच्या आरक्षणाच्या दाव्यासाठी सादर केलेले अपंगत्वाचे प्रमाणपत्रात दिव्यांगत्व कायमस्वरुपी असून त्याचे प्रमाण ४०% किंवा त्यापेक्षा जास्त आहे असा स्पष्ट उल्लेख असला पाहिजे.

५.३.८ दिव्यांगाच्या आरक्षणाकरिता फक्त वैद्यकीय मंडळाकडून दिलेले प्रमाणपत्र विचारात घेतले जाईल.

५.३.९ दिव्यांग उमेदवारांनी प्रवेश अर्ज भरताना प्रपत्र१: व्यवसाय तपशील यादी आणि पात्रता याचा अभ्यास करून प्रवेश अर्ज भरावा. अधिकच्या माहितीसाठी जवळच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत संपर्क साधावा.

५.२ **अनाथ मुलांना समांतर आरक्षण:**

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ अन्वये काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या अनाथ, निराधार बालकांना संस्थेतून बाहेर पडल्यानंतर जातीचा दाखला नसल्यामुळे विविध शासकीय लाभांपासून वंचित रहावे लागते. त्यामुळे अनाथ मुलांना राज्य शासनाच्या विविध सवलतींचा लाभ घेता यावा, याकरीता महिला व बाल

विकास विभाग शासन निर्णय क्र. अमुजा-२०११/प्र.क्र.२१२/का-३, दि.०२.०४.२०१८ अन्वये शिक्षण व नोकरी यांमध्ये खुल्या प्रवर्गातून १% समांतर आरक्षण लागू करण्यात आले आहे.

त्यानुसार नियम १.४ मध्ये विहीत केलेल्या केंद्रीय प्रवेश पध्दती अंतर्गत उपलब्ध जागांच्या १% जागा अनाथ मुलांना आरक्षित असतील. महिला व बालविकास विभाग शासन निर्णय क्रमांक अनाथ- २०२२ /प्र. क्र. १२२/ का- ०३ दिनांक ६ एप्रिल २०२३ च्या शासन निर्णयाद्वारे अनाथ आरक्षण धोरणामध्ये बदल करण्यात आलेला आहे. त्यासाठी उमेदवारांनी खालील अटी व शर्तीची पूर्तता करणे आवश्यक राहील.

५.२.१ महिला व बालविकास विभागाकडून देण्यात येणारे अनाथ प्रमाणपत्र असणाऱ्या उमेदवारांसाठीच हे आरक्षण लागू राहील.

५.२.२ अनाथ आरक्षणासाठी अजण करणा या उमेदवाराने तो महाराष्ट्र राज्याचा अहधवासी (Domicile) असल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल.

५.२.३ संबंधित प्रवेशप्रक्रियेत अनाथ उमेदवार उपलब्ध न झाल्यास आरक्षणाचा अनुशेष पुढे न ओढता खुल्या प्रवर्गातून गुणवत्तेनुसार इतर उमेदवार प्रवेशास पात्र ठरतील.

५.२.४ शिक्षणांतर्गत शिष्यवृत्ती, वसतिगृह व व्यावसायिक शिक्षणांतर्गत शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजनेमध्ये सदर आरक्षण लागू राहील.

**५.३ स्त्री उमेदवाराकरिता आरक्षण:**

५.३.१ प्रत्येक औ.प्र.संस्थेमध्ये नियम १.४ मध्ये विहीत केलेल्या केंद्रीय प्रवेश पध्दती अंतर्गत उपलब्ध जागांपैकी ३०% जागा महिला उमेदवारांसाठी आरक्षित असतील.

५.३.२ हे आरक्षण सर्वसामान्य, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती-अ, भटक्या जमाती-ब, भटक्या जमाती-क, भटक्या जमाती-ड आणि इतर मागासवर्गासाठी लागू राहील.

५.३.३ केंद्रीय प्रवेश पध्दती अंतर्गत येणाऱ्या मूळ जिल्ह्यात ९०% जागा आणि जिल्हाबाह्य १०% जागा या दोन्ही जागांमध्ये महिला उमेदवारांसाठी जागा आरक्षण उपलब्ध आहेत.

५.३.४ संरक्षण, अपंग आणि विशेष मागासवर्ग या श्रेणीमध्ये महिला उमेदवारांना आरक्षण लागू राहणार नाही.

५.३.५ खाजगी औ.प्र.संस्थामध्ये अल्पसंख्यांक उमेदवारांसाठी आरक्षित जागांमध्ये महिला उमेदवारांना आरक्षण नसेल.

**५.४ विशिष्ठ समाज घटकांकरीता स्थापन खाजगी औ.प्र. संस्थेत त्या घटकांसाठी प्रवेशासाठी उपलब्ध जागांबाबत आरक्षण:**

५.४.१ काही विशिष्ट समाज घटकांसाठी सुरू करण्यात आलेल्या खाजगी औ.प्र. संस्था जसेकी संरक्षण सेवेतील निवृत्त कर्मचारी, अपंग उमेदवार, महिला उमेदवार, अनाथ उमेदवार, प्रकल्प ग्रस्त उमेदवार, बाल गुन्हेगार, कर्मचारी पाल्य उमेदवार, इत्यादींसाठी काही प्रमाणात जागा राखिव ठेवतात. अशा खाजगी औ.प्र. संस्थांनी त्याबाबतची माहिती संचालनालयास प्रवेश प्रक्रिये पूर्वी सादर करावी.

५.४.२ प्रवेश सक्षम अधिकारी अशा खाजगी औ.प्र. संस्थांची यादी व विशिष्ट समाजघटकांसाठी आरक्षित जागांची टक्केवारी प्रेवश माहिती पुस्तिकेत “प्रपत्र - ७” म्हणुन प्रकाशित करतील.

५.४.३ विशिष्ट समाज घटकांतील उमेदवारांसाठी राखिव जागांवरील प्रवेश त्या पात्र उमेदवारांमधुन वैधानिक आरक्षणाच्या प्रमाणात भरण्यात येतील.

**५.५ मागासवर्गीय उमेदवारांकरिता आरक्षण:**

५.५.१ महाराष्ट्र राज्यातील विविध मागासवर्गीय उमेदवारांसाठी नियम १.४ मध्ये विहीत केल्याप्रमाणे केंद्रीय प्रवेश पध्दती अंतर्गत, उपलब्ध जागांचा तपशील खाली नमूद केलेल्या तक्त्यात दिला आहे. मागासवर्गीय उमेदवार ज्या प्रकारात मोडतात त्याबाबतचा दावा त्यांनी अर्ज करतेवेळी करावा.

अर्ज करतेवेळी उमेदवाराने मागासवर्गीय असल्याचा दावा केला नाही आणि त्यानंतर प्रवेशाच्या वेळेस आवश्यक ती कागदपत्रे सादर करुन आरक्षणावर हक्क सांगितल्यास असा दावा विचारात घेतला जाणार नाही.

| अ.क्र. | आरक्षणाची वर्गवारी | आरक्षणाची टक्केवारी |
|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती (SC) | १३ |
| २ | अनुसूचित जमाती (ST) | ७ |
| ३ | विमुक्त जाती -अ (VJ/DT) | ३ |
| ४ | भटक्या जमाती - ब (NT-B) | २.५० |
| ५ | भटक्या जमाती -क (NT-C) | ३.५० |
| ६ | भटक्या जमाती -ड (NT-D) | २ |
| ७ | इतर मागासवर्ग (OBC) | १९ |
| ८ | सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (SEBC) वर्गातील घटकांसाठी** | १० |
| ९ | खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी | १० |
| | एकूण आरक्षण * | **७०** |
| | सामान्य | **३०** |
| | एकूण | **१००** |

* वरील आरक्षणामध्ये प्रवेश प्रक्रीयेच्या वेळेस प्रचलित शासन निर्यणानुसार बदल संभवतो

**एसईबीसी उमेदवारांच्या बाबतीत आरक्षण धोरण मा. न्यायालयाच्या संबधित रिट पिटीशन मधील आदेशानुसार असेल.

५.५.२ खाजगी अल्पसंख्यांक औ.प्र.संस्थामध्ये मागासवर्ग उमेदवारांकरिता आरक्षण उपलब्ध राहणार नाही.

५.५.३ सक्षम प्राधिकाऱ्याच्या कक्षेत येणाऱ्या व महाराष्ट्र राज्यातील उमेदवारांना उपलब्ध असलेल्या जागांपैकी वाटपाच्या दुसऱ्या फेरीच्या अंतिम टप्प्यात जागा रिक्त असल्यास २ टक्के पर्यंतचे आरक्षण विशेष मागासप्रवर्गातील (वि.मा.प्र.) उमेदवारांना देण्यात येईल. या जागा वाटप प्रक्रियेच्या दुसऱ्या फेरीमध्ये घेण्यात आल्या असून त्यासाठी वाटप प्रक्रिया सुरु होण्याच्या आधीपासून वेगळया जागा राखून ठेवण्यात आलेल्या नाहीत. सर्वसाधारण प्रवेश प्रक्रियेमध्ये विशेष मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांकरिता एकूण उपलब्ध असलेल्या जागांपैकी २ टक्के पेक्षा अधिक राखीव जागा असणार नाहीत आणि एकूण आरक्षण ५० टक्क्यांहून अधिक असणार नाही याची खबरदारी घेण्यात येईल.

५.५.४ गुणवत्तेच्या आधारे एखाद्या मागास प्रवर्गातील उमेदवाराची खुल्या प्रवर्गातील जागेसाठी निवड झाल्यास सदर उमेदवारास प्रवेश निश्चिती साठी मागास प्रवर्गातील उमेदवारासाठी लागू असलेले दस्तऐवज/प्रमाणपत्रे सादर करणे बंधनकारक राहणार नाही. मात्र उमेदवारांनी मागास प्रवर्गातील उमेदवारांसाठी लागू असलेले दस्तऐवज/प्रमाणपत्र सादर केल्यास संबंधित उमेदवार मागास प्रवर्गातील उमेदवारांसाठी लागू असलेले सर्व प्रकारच्या शासकीय सवलती/भत्ते मिळण्यासाठी पात्र ठरतील.

५.५.५ महाराष्ट्र राज्याबाहेरील व अनिवासी भारतीय उमेदवारांना खुल्या प्रवर्गातील उमेदवार समजण्यात येईल आणि आरक्षणाचा दावा करण्यास ते पात्र असणार नाहीत.

## ५.६ धार्मिक अल्पसंख्यांकाकरिता आरक्षित जागा:

### ५.६.१ शासकीय औ.प्र.संस्थांमध्ये धार्मिक अल्पसंख्यांक उमेदवारांकरिता आरक्षित तुकडया:

५.६.१.१ शासकीय औ.प्र.संस्थेमधील निवडक तुकडयांमध्ये ७० टक्के जागा मुस्लिम, बौध्द, ख्रिश्चन, शीख, पारशी व जैन धर्मातील विद्यार्थ्यांकरिता आणि ३० टक्के जागा खुल्या व मागासवर्ग श्रेणीमधील उमेदवारांकरिता राखून ठेवलेल्या आहेत.

५.६.१.२ प्रत्येक अभ्यासक्रमाकरिता वर नमूद केलेल्या धार्मिक अल्पसंख्यांक उमेदवारांकरिता ७० टक्के जागा राखून ठेवण्यात येतील (त्यापैकी प्रत्येक अल्पसंख्यांक गटामध्ये ३० टक्के जागा महिलांकरिता राखून ठेवण्यात येतील) व ३० टक्के जागा सर्व अन्य खुल्या आणि मागास प्रवर्गातील उमेदवारांकरिता उपलब्ध असतील आणि वरील नियम क्र. ५.६.१ यामध्ये नमूद केलेल्या सर्वसामान्य आरक्षणाच्या आकृतिबंधाप्रमाणे भरण्यात येतील.

| अ. क्र. | धार्मिक अल्पसंख्यांक गट | धार्मिक अल्पसंख्याकाकरिता राखीव असलेल्या ७० टक्के जागांमधील वितरीत करावयाची टक्केवारी |
|---|---|---|
| १. | मुस्लिम | ५४.०० |
| २. | बौध्द | ३१.०० |
| ३. | ख्रिश्चन | ०६.०० |
| ४. | शीख | ०१.०० |
| ५. | जैन | ०७.०० |
| ६ | पारशी | ०१.०० |
| | एकूण | १००.०० |

५.६.१.३ विहीत आरक्षणाच्या पुरेशा प्रमाणात महिला उमेदवार उपलब्ध नसल्यास अशा जागा संबंधित धार्मिक अल्पसंख्यांक गटातील पुरुष उमेदवारांमधून भरण्यात येतील.

५.६.१.४ विशिष्ट अल्पसंख्यांक धार्मिक गटामध्ये पुरेसे उमेदवार उपलब्ध नसल्यास आणि उपलब्ध जागा भरल्या न गेल्यास अशा रिक्त जागा अन्य धार्मिक अल्पसंख्यांक गटामधून गुणवत्तेच्या आधारे भरण्यात येतील.

५.६.१.५ अल्पसंख्यांक उमेदवारांना बिगर अल्पसंख्यांक औ.प्र.संस्था/व्यवसाय/तुकडी यामध्ये आरक्षण उपलब्ध असणार नाही. बिगर अल्पसंख्यांक औ.प्र. संस्था/ व्यवसायांच्या तुकडीसाठी अल्पसंख्यांक उमेदवारांना त्यांच्या प्रवर्गानुसार वा खुल्या प्रवर्गातील उमेदवार समजण्यात येईल.

५.६.१.६ शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये उमेदवाराच्या धर्माची स्पष्ट नोंद असणे आवश्यक आहे. शाळा सोडण्याच्या दाखल्यात उमेदवाराच्या धर्माची स्पष्ट नोंद नसल्यास अशा उमेदवाराला त्याच्या धर्माच्या पुष्ठ्यर्थ इतर संबंधित दस्तऐवजाचे पुरावे सादर करावे लागतील.

५.६.१.७ अल्पसंख्यांक उमेदवारांसाठी राखीव जागांवर प्रवेशासाठी फक्त महाराष्ट्र राज्याचे अधिवास असलेले अल्पसंख्यांक उमेदवार पात्र असतील. अशा उमेदवारांनी महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र अथवा उमेदवाराची आई अथवा वडील महाराष्ट्र राज्याचे अधिवास असल्याचे प्रमाणपत्र सादर करणे बंधन कारक आहे.

५.६.१.८ वरील नियमांमध्ये अल्पसंख्यांक विकास विभाग वा शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयांप्रमाणे आवश्यक ते बदल करण्यात येतील.

**५.६.२ अल्पसंख्यांकांकरिता संस्था म्हणून नोंदविण्यात आलेल्या खाजगी औ.प्र. संस्था:**

५.६.२.१ संबंधित अल्पसंख्यांक प्रवर्गातील उमेदवाराकरिता अशा खाजगी औ.प्र. संस्थेमध्ये किमान ५१ टक्के जागा राखीव असतील.

५.६.२.२ अशा खाजगी औ.प्र.संस्थांनी केंद्रीय प्रवेश प्रक्रियेकरिता उपलब्ध असलेल्या जागांपैकी अल्पसंख्यांक प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल राखीव आरक्षणाची टक्केवारी १५ एप्रिल पूर्वी सक्षम अधिकाऱ्यांना कळविणे आवश्यक आहे.

५.६.२.३ अशा खाजगी औ.प्र.संस्था, संस्था पातळीवर एकूण उपलब्ध जागांच्या जास्तीत जास्त २० टक्के जागांवर प्रवेश देवू शकतात.

५.६.२.४ अल्पसंख्यांक उमेदवारांना बिगर अल्पसंख्यांक औ.प्र.संस्था/व्यवसाय/तुकडी यामध्ये आरक्षण उपलब्ध असणार नाही. बिगर अल्पसंख्यांक औ.प्र.संस्था/ व्यवसाय तुकडीसाठी अल्पसंख्यांक उमेदवारांना त्यांच्या प्रवर्गानुसार वा खुल्या प्रवर्गातील उमेदवार समजण्यात येईल.

५.६.२.५ शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये उमेदवाराच्या धर्माची स्पष्ट नोंद असणे आवश्यक आहे. शाळा सोडण्याच्या दाखल्यात उमेदवाराच्या धर्माची स्पष्ट नोंद नसल्यास अशा उमेदवाराला त्याच्या धर्माच्या पुष्ठ्यर्थ इतर संबंधित दस्तऐवजाचे पुरावे सादर करावे लागतील.

५.६.२.६ वरील नियमांमध्ये अल्पसंख्यांक विकास विभाग वा शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयांप्रमाणे आवश्यक ते बदल करण्यात येतील.

**५.७ अनुसूचित जाती कार्यक्रम (SCP), आदिवासी उपयोजना (TSP) व आदिवासी सार्वत्रिकरण योजनेंतर्गत शासकीय औ.प्र.संस्थामध्ये असलेला आरक्षणाचा आकृतीबंध**

| अ. क्र. | प्रवर्ग | तुकडीनिहाय आरक्षणाचा आकृतीबंध | | |
|---|---|---|---|---|
| | | शासकीय औ.प्र.संस्था - अनुसूचित जाती कार्यक्रम | शासकीय औ.प्र.संस्था - आदिवासी उपयोजना | शास. औ.प्र.संस्था - सार्वत्रिकरण |
| ज्या प्रवर्गासाठी योजना अस्तित्वात आहे त्या प्रवर्गाकरिता एकूण जागांचा आरक्षित जागा | | | | |
| १. | अनुसूचित जाती | ८० | ० | ० |
| २. | अनुसूचित जमाती | ० | ७५ | १०० |
| ३. | सर्वसाधारण | २० | २५ | ० |
| **४.** | **एकूण** | **१००** | **१००** | **१००** |
| ज्या प्रवर्गासाठी योजना अस्तित्वात आहे त्या प्रवर्गाकरिता एकूण जागांच्या आरक्षित जागांव्यतिरिक्त सर्वसाधारण आरक्षण आकृतिबंधाप्रमाणे भरावयाच्या जागांचा तपशिल | | | | |
| १. | अनुसूचित जाती (SC) | ० | १३ | ० |
| २. | अनुसूचित जमाती (ST) | ७ | ० | ० |
| ३. | विमुक्त जाती-अ (VJ/DT - A) | ३ | ३ | ० |
| ४. | भटक्या जमाती - ब (NT - B) | २.५० | २.५० | ० |
| ५ | भटक्या जमाती - क (NT - C) | ३.५० | ३.५० | ० |
| ६ | भटक्या जमाती - ड (NT - D) | २ | २ | ० |
| ७ | इतर मागासवर्ग (OBC) | १९ | १९ | ० |
| ८ | खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी | १० | १० | ० |
| ९ | सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (SEBC) | १० | १० | ० |
| १० | सामान्य/ खुला (General/ Open) | ४३ | ३७ | ० |
| **११** | **एकूण (Total)** | **१००** | **१००** | **०** |

**६ विविध प्रकारच्या उमेदवारांकरिता आवश्यक असणारे कागदपत्र:**

६.१ प्रवेश निश्चितीच्या वेळेस वेगवेगळया उमेदवाराने जसे अ,ब,क,ड व इ सादर कराव्या लागणाऱ्या मूळ कागदपत्रांची यादी **प्रपत्र - ३** मध्ये दिलेली आहे.

६.२ उमेदवाराने प्रवेश निश्चितीच्या वेळी निवड झालेल्या औ.प्र.संस्थेमध्ये सर्व मूळ कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

६.३ उमेदवारास शाळा सोडल्याचा मूळ दाखला (अंतिम प्रवेशित शाळा/महाविद्यालय), पात्र परिक्षेची गुणपत्रिका, सर्व आवश्यक कागदपत्रांच्या छायाप्रतींचा (झेरॉक्स) एक सत्यप्रतीत केलेला संच आणि पासपोर्ट आकाराचे २ रंगीत छायाचित्रे प्रवेश निश्चितीच्या वेळेस निवड झालेल्या औ.प्र.संस्थेमध्ये सादर करावी लागतील.

**७ भाषांतर:**

एखाद्या उमेदवाराने मराठी, हिंदी अथवा इंग्रजी भाषेत नसलेले कोणतेही प्रमाणपत्र सादर केल्यास त्याची अधिकृत मराठी, हिंदी अथवा इंग्रजी भाषेत भाषांतर केलेली आणि राजपत्रित अधिकाऱ्याने साक्षांकीत केलेली प्रत अर्ज स्वीकृती केंद्रावर अर्ज निश्चितीसाठी तसेच निवड झालेल्या औ.प्र.संस्थेत प्रवेशनिश्चितीसाठी सादर करणे आवश्यक आहे.

## ८ गुणवत्तेसाठी गुणाधिक्य:

अंतिम गुणवत्ता ठरविण्याकरिता उमेदवारांना खालील प्रकारे काही व्यवसायांना अतिरिक्त गुणांचा लाभ देण्यात येईल. तथापि, सदर अतिरिक्त गुणांची मर्यादा ५० गुण एवढी असेल

| अ.क्र. | पात्रतेचे वर्णन | गुण |
|---|---|---|
| ८.१ | इंटरमिडीएट चित्रकला परीक्षा उत्तीर्ण उमेदवार | १० |
| ८.२ | विविध स्तरावर क्रिडा प्रकारांमध्ये सहभाग घेतलेला उमेदवार | |
| | ८.२.१ जिल्हा स्तरीय स्पर्धा | १० |
| | ८.२.२ राज्य स्तरीय स्पर्धा | १५ |
| | ८.२.३ राष्ट्रीय स्तरावर स्पर्धा | २५ |
| ८.३ | शासन मान्यताप्राप्त महाराष्ट्रातील बोल्स्टर स्कूलमधून उत्तीर्ण झालेले उमेदवार | २० |
| ८.४ | तांत्रिक वा व्यावसायिक अभ्यासक्रम घेऊन माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण उमेदवार | १० |
| ८.५ | संरक्षण सेवेतील खालील कर्मचारी वा कर्मचाऱ्यांचे पाल्य<br>८.५.१ युध्दात वीर मरण प्राप्त झालेल्या संरक्षण सेवेतील कर्मचारी/अधिकारी यांचे पाल्य<br>८.५.२ युध्दात अपंगत्व प्राप्त झालेला माजी सैनिक<br>८.५.३ युध्दात अपंगत्व प्राप्त झालेले संरक्षण सेवेतील कर्मचारी/अधिकारी यांचे पाल्य<br>८.५.४ किमान ५ वर्षे सेवा झालेला माजी सैनिक<br>८.५.५ महाराष्ट्र राज्यात अधिवास असलेल्या माजी सैनिकांचे पाल्य<br>८.५.६ महाराष्ट्र राज्यात अधिवास असलेले व सेवेत असलेल्या सैनिकांचे पाल्य<br>८.५.७ महाराष्ट्र राज्यात बदली झालेली आहे परंतु महाराष्ट्र राज्याचे अधिवास नसणारे संरक्षण सेवेतील कर्मचाऱ्यांचे/अधिकाऱ्यांचे पाल्य<br>८.५.८ संरक्षण सेवेतील कार्यरत कर्मचारी की जे महाराष्ट्र राज्यातील अधिवास नसणारे, परंतु मुलांच्या शिक्षणाच्या कारणास्तव लगतपूर्वीच्या कार्यालयांतर्गत कुटुंब निवासस्थान ताब्यात ठेवण्याच्या तरतुदीनुसार यांचे कुटुंब महाराष्ट्र राज्यात राहत आहे असा पाल्य, परंतु अशा उमेदवाराने महाराष्ट्र राज्यातील मान्यताप्राप्त शाळेतून माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (SSC) दिलेली पाहिजे. | १० |

वर उल्लेखिल्याप्रमाणे गुणाधिक्यासाठी पुराव्यादाखल सादर करावयाची कागदपत्रे **प्रपत्र - ३** मध्ये दिल्यानुसार आहेत.

## ९ गुणानुक्रमांक देणे:

### ९.१ गुणानुक्रम:

नियम क्र. २.० नुसार महाराष्ट्र राज्यातील ज्या पात्र उमेदवारांची शिल्प कारागीर प्रशिक्षण योजनेंतर्गत येणाऱ्या व्यवसाय अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी केंद्रीय प्रवेश पध्दतीमधून नेमून दिलेल्या शेवटच्या तारखेपर्यंत ऑनलाईन अर्ज सादर करुन निश्चित केलेला आहे अशा प्रत्येक उमेदवाराला खाली नमूद केलेल्या निकषानुसार तात्पुरता गुणानुक्रम (Provisional Merit Number) देण्यात येईल.

९.१.१ माध्यमिक शालांत परीक्षा (इयत्ता १०वी) अथवा समतुल्य पात्रता परीक्षा यामध्ये प्राप्त एकत्रित गुण हे गुणवत्ता ठरविण्यासाठी पायाभूत गुण मानण्यात येतील.

९.१.२ नियम क्र.८ मध्ये नमूद केल्यानुसार कोणत्याही प्रकरणी, अतिरिक्त मिळालेले गुणाधिक्य एकूण गुणांमध्ये मिळविण्यात येतील.

९.१.३ अशा प्रकारे तयार करण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्यातील उमेदवारांची गुणवत्ता यादी पुढील बाबी दर्शविल.

९.१.३.१ राज्यस्तरीय सर्वसाधारण गुणवत्ताक्रमांक
९.१.३.२ राज्यस्तरीय प्रवर्गांतर्गत गुणवत्ता क्रमांक ( लागू असल्याप्रमाणे )
९.१.३.३ मूळ जिल्हा सर्वसाधारण गुणानुक्रमांक
९.१.३.४ मूळ जिल्हा प्रवर्गांतर्गत गुणानुक्रमांक (लागू असेल त्याप्रमाणे )

९.१.४ राज्याबाहेरील व अनिवासी भारतीय उमेदवारांची अशाप्रकारे तयार केलेली गुणवत्ता यादी राज्यस्तरीय सर्वसाधारण गुणवत्ताक्रमांक दर्शविल.

९.१.५ गुणवत्ता क्रम देण्यात आल्यामुळे कोणत्याही जागेवरील प्रवेशाची हमी दिली असे होत नाही.

**९.२ सम गुणवत्ता झाल्यास सापेक्ष गुणवत्ता:**

उमेदवारांची गुणवत्ता एकसारखी आल्यास, म्हणजेच उमेदवारांचे माध्यमिक शालांन्त प्रमाणपत्र परिक्षेतील (SSC) एकत्रित गुण अधिक अतिरिक्त बाहय गुणाधिक्य मिळून होणारे एकूण गुण हे समान असल्यास उमेदवारांतील परस्पर गुणवत्तेचे पुढे नमूद केल्याप्रमाणे पुनर्मुल्यमापन करण्यात येईल.

९.२.१ ज्या उमेदवाराने माध्यमिक शालांन्त प्रमाणपत्र (SSC) परिक्षेत सर्वाधिक गुण मिळविले असतील त्याला प्रथम प्राधान्य राहील.

९.२.२ ज्या उमेदवारांने माध्यमिक शालांन्त प्रमाणपत्र (SSC) परिक्षेत व्यावसायिक/तांत्रिक विषयात अधिक गुण मिळविले असतील, त्यास द्वितीय प्राधान्य राहील.

९.२.३ ज्या उमेदवाराने माध्यमिक शालांन्त प्रमाणपत्र (SSC) परिक्षेत गणित विषयात अधिक गुण मिळविले असतील, त्यास तृतीय प्राधान्य राहील.

९.२.४ ज्या उमेदवारास माध्यमिक शालांन्त प्रमाणपत्र (SSC) परिक्षेत विज्ञान विषयात अधिक गुण मिळविले असतील त्यास चतुर्थ प्राधान्य देण्यात येईल.

९.२.५ उमेदवाराच्या जन्मतारखेला पाचवे प्राधान्य दिले जाईल. (वय जास्त असलेल्या उमेदवाराला प्राधान्य)

**९.३ इयत्ता बारावी अर्हता असणाऱ्या व्यवसायांची गुणवत्ता यादी तयार करण्यासाठी गुणानुक्रम :**

९.३.१ उच्च माध्यमिक शालांत परीक्षा इयत्ता बारावी (HSC)अथवा समतुल्य पात्रता परीक्षा यामध्ये प्राप्त एकत्रित गुण हे गुणवत्ता ठरवण्यासाठी पायाभूत गुण मानण्यात येतील

९.३.२ इयत्ता बारावी (HSC) अर्हता असलेल्या व्यवसायांसाठी गुणवत्ता यादी तयार करताना कोणत्याही प्रकरणी कोणत्याही प्रकारचे अतिरिक्त गुणाधिक्य एकूण गुणांमध्ये मिळवण्यात येणार नाही.

९.३.३ इयत्ता बारावी (HSC)अर्हता असलेल्या व्यवसायांच्या गुणवत्ता यादीमध्ये उमेदवारांची गुणवत्ता एकसारखी आल्यास म्हणजेच उमेदवाराचे उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेतील HSC एकूण गुण समान आल्यास उमेदवारांतील परस्पर गुणवत्तेचे अ.क्र.९.२.१ ते ९.२.५ प्रमाणे पुनर्मूल्यमापन करण्यात येईल.

**९.४ पूर्व तपासणी/ पूर्व मुल्यांकनामुळे गुणातील बदल:**

९.४.१ पूर्व तपासणी/पूर्व मुल्यांकनामुळे पात्र परिक्षेच्या गुणांमध्ये बदल झाल्यास आणि असा बदल महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाने अथवा समतुल्य संस्थेने यथोचितरित्या प्रमाणित केल्यास त्याप्रमाणे प्रवेश अर्जात तात्काळ बदल करण्यात यावा.

९.४.२ तथापि, अशा प्रकारे गुणांमधील बदल ऑनलाईन अर्ज शुल्क जमा करण्याच्या वा हरकती नोंदवीणे या फेरीच्या अंतिम दिनांकापूर्वी करणे आवश्यक राहील. तद्‌नंतर प्रवेश अर्जात कोणत्याही प्रकारे बदल करणे शक्य होणार नाही.

**१० केंद्रीय प्रवेश प्रक्रियेच्या फेऱ्यांमधील प्रवेशाबाबत नियम:**

| प्रवेश फेरी | शेरा |
|---|---|
| प्रथम प्रवेश फेरी | उमेदवाराने सादर केलेल्या पसंतीक्रमाच्या प्रथम विकल्पानुसार जागा मिळाल्यास उमेदवाराला प्रवेश निश्चित करावा लागेल. अशा उमेदवाराने प्रवेश निश्चित केला अथवा केला नाही तरीही त्यास केंद्रीय प्रवेश प्रक्रियेच्या पुढील प्रवेश फेऱ्यांमध्ये सहभागी होता येणार नाही.<br>ज्या उमेदवारांना विकल्प क्र.२ ते १०० मधुन जागा वाटप झाली आहे, त्यांची इच्छा असेल तर ते प्रवेश निश्चित करु शकतात. परंतु, असे प्रवेश निश्चित केलेले उमेदवार केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेच्या पुढील फेऱ्यांमध्ये म्हणजे फेरी २ ते ५ मध्ये सहभागी होऊ शकणार नाहीत. |

| प्रवेश फेरी | शेरा |
|---|---|
| **द्वितीय प्रवेश फेरी** | उमेदवाराने सादर केलेल्या पसंतीक्रमाच्या पहिल्या तीन विकल्पांपैकी कोणत्याही एका विकल्पानुसार जागा मिळाल्यास प्रवेश निश्चित करावा लागेल. अशा उमेदवाराने प्रवेश निश्चित केला अथवा केला नाही तरीही त्यास केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेच्या पुढील प्रवेश फेऱ्यांमध्ये सहभागी होता येणार नाही.<br>ज्या उमेदवारांना विकल्प क्र.४ ते १०० मधुन जागा वाटप झाली आहे त्यांची इच्छा असेल तर ते प्रवेश निश्चित करु शकतात. परंतु, असे प्रवेश निश्चित केलेले उमेदवार केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेच्या पुढील फेऱ्यांमध्ये म्हणजे फेरी ३ ते ५ मध्ये सहभागी होऊ शकणार नाहीत. |
| **तृतीय प्रवेश फेरी** | उमेदवाराने सादर केलेल्या पसंती क्रमाच्या पहिल्या पाच विकल्पांपैकी एका विकल्पानुसार जागा मिळाल्यास प्रवेश निश्चित करावा लागेल. अशा उमेदवाराने प्रवेश निश्चित केला अथवा केला नाही तरीही त्यास केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेच्या पुढील प्रवेश फेऱ्यांमध्ये सहभागी होता येणार नाही.<br>ज्या उमेदवारांना विकल्प क्र.६ ते १०० मधून जागा वाटप झाली आहे. त्यांची इच्छा असेल तर ते प्रवेश निश्चित करु शकतात. परंतु असे प्रवेश निश्चित केलेले उमेदवार केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेच्या पुढील फेऱ्यांमध्ये म्हणजे फेरी ४ ते ५ मध्ये सहभागी होऊ शकणार नाहीत. |
| **चतुर्थ प्रवेश फेरी** | उमेदवाराने सादर केलेल्या पसंतीक्रमाच्या कुठल्याही एका विकल्पांपैकी जागा मिळाल्यास प्रवेश निश्चित करावा लागेल अशा उमेदवाराने प्रवेश निश्चित केला अथवा केला नाही तरीही त्याला केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेच्या पुढील प्रवेश फेरीमध्ये म्हणजेच पाचव्या फेरीमध्ये सहभाग घेता येणार नाही. |
| **पाचवी प्रवेश फेरी** | या फेरीमध्ये उपलब्ध सर्व जागा हया सर्वसाधारण जागा म्हणून समजल्या जातील. पाचव्या केंद्रीय प्रवेश प्रक्रिया फेरीमध्ये (जिल्हास्तरीय समुपदेशन प्रवेश फेरी) सहभागी होण्यास महाराष्ट्र राज्यातील नोंदणीकृत उमेदवारांमधून ज्या उमेदवारांना प्रवेशफेरी १ ते ४ यामध्ये जागा देण्यात आलेली नाही/ अनिवार्य विकल्पाशिवाय इतर विकल्पांपैकी जागा मिळाली परंतु प्रवेश निश्चित केले नाही असे उमेदवार पात्र असतील. परंतु, प्रवेश फेरी १ ते ४ यामध्ये प्रवेश निश्चित केले असतील/ अनिवार्य विकल्पापैकी जागा मिळाली परंतु प्रवेश निश्चित केले नाहीत असे उमेदवार पात्र नाहीत. |

११ **जागा वाटपाची तर्क पध्दती:**

सक्षम अधिकाऱ्याच्या अधिकारांतर्गत येणाऱ्या मूळ जिल्ह्यातील जागा आणि अन्य जिल्ह्यातील उमेदवारांसाठी राज्यस्तरीय जागा वाटप करण्याची तर्कपध्दती.

११.१ **टप्पा प्रथम - सर्व उमेदवारांकरिता:**

११.१.१ सर्व प्रवर्गांमधील म्हणजेच खुला/ राखीव/ पुरुष/ महिला उमेदवारांना गुणवत्तेनुसार जागा वाटप करण्यात येईल.

११.१.२ मागासवर्गीय उमेदवारांना त्यांच्या गुणवत्तेच्या आधारे प्रथम खुल्या प्रवर्गामध्ये व खुल्या प्रवर्गातील जागा गुणवत्तेच्या आधारे उपलब्ध नसल्यास राखीव प्रवर्गामध्ये जागा वाटप करण्यात येईल.

११.१.३ विशेष मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांचा त्यांच्या गुणवत्तेच्या आधारे प्रथम खुल्या प्रवर्गातील जागा वाटपासाठी विचार करण्यात येईल. गुणवत्तेच्या आधारे खुल्या प्रवर्गात जागा उपलब्ध नसल्यास ज्या विशेष मागासवर्गीय उमेदवारांचा (SBC) मूळ प्रवर्ग इतर मागासवर्ग असा आहे त्यांना त्यांच्या मूळ प्रवर्गातील राखीव जागांवर गुणवत्तेनुसार जागा वाटपाचा विचार करण्यात येईल.

११.१.४ अपंग प्रवर्गातील उमेदवारांना त्यांच्या गुणवत्तेच्या आधारे त्यांना प्रथम राखीव असलेल्या जागांसाठी गुणवत्तेनुसार विचारात घेण्यात येईल. तदनंतर अपंग उमेदवारांसाठी राखीव जागा उपलब्ध नसल्यास, त्यांना गुणवत्तेनुसार खुल्या प्रवर्गातील जागांसाठी विचारात घेण्यात येईल.

११.१.५ महिला उमेदवारांकरिता जागेची उपलब्धता पुढे नमूद केलेल्या पध्दतीनुसार तपासण्यात येईल:

११.१.५.१ खुल्या प्रवर्गातील महिलांकरिता राखीव जागा

११.१.५.२ खुल्या प्रवर्गातील सर्वसाधारण जागा

११.१.५.३ लागू असलेल्या संबंधित जाती प्रवर्गातील महिलांकरिता राखीव जागा

११.१.५.४ लागू असलेल्या संबंधित जाती प्रवर्गातील सर्वसामान्य जागा

**११.२ टप्पा दुसरा - संबंधित खुल्या/मागासवर्गातील उमेदवार:**

११.२.१ या टप्प्यात सर्व खुल्या आणि मागासवर्गातील उमेदवारांचा जागा वाटपाकरिता विचार केला जाईल.

११.२.२ निर्धारीत केलेल्या टक्केवारीप्रमाणे जर महिला खुल्या/मागास प्रवर्गातून मिळाल्या नाहीत तर उर्वरित रिक्त जागा संबंधित खुल्या/आरक्षित प्रवर्गातील पुरुष वा महिला उमेदवारांमधून भरल्या जातील.

**११.३ टप्पा तिसरा - विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांकरिता :**

टप्पा २ पूर्ण झाल्यानंतर जर वर नमूद करण्यात आलेल्या मागास प्रवर्गांमधील एखादया प्रवर्गांमधील आरक्षणाच्या आवश्यक त्या टक्केवारीच्या प्रमाणात जर उमेदवार मिळत नसेल तर अशा रिक्त राहणाऱ्या जागा विशेष मागास प्रवर्गांतील (SBC) उमेदवारांमधून (स्त्री व पुरुष एकत्रितरीत्या) केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेनुसार सक्षम अधिकाऱ्याच्या कार्यकक्षेत महाराष्ट्रामधील उमेदवारांमधून कमाल २% च्या मर्यादेपर्यंत त्यांच्या संबंधित गुणवत्तेनुसार भरण्यासाठी विचार केला जाईल. हा टप्पा फक्त मूळ जिल्ह्यातील जागांसाठी असेल.

**११.४ टप्पा चौथा - संबंधित मागास प्रवर्ग उमेदवार गटाकरिता:**

११.४.१ या टप्प्यात सर्व मागास प्रवर्ग उमेदवार गटांचा जागा वाटपाकरिता खाली नमूद केल्याप्रमाणे विचार केला जाईल.

११.४.१.१ **गट - १**

११.४.१.१.१ अनुसूचित जाती (SC)

११.४.१.१.२ अनुसूचित जमाती (ST)

११.४.१.२ **गट- २**

११.४.१.२.१ विमुक्त जाती आणि भटक्या जमाती (VJ/DT, NT-A)

११.४.१.२.२ भटक्या जमाती (NT -B)

११.४.१.३ **गट -३**

११.४.१.३.१ भटक्या जमाती २ (NT -C)

११.४.१.३.२ भटक्या जमाती ३ (NT-D)

११.४.१.३.३ इतर मागासवर्ग (OBC)

११.४.१.३.४ सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्ग (SEBC)

११.४.२ तिसरा टप्पा पूर्ण झाल्यानंतर ऊर्वरित रिक्त जागांकरिता वर नमूद केल्याप्रमाणे संबंधित प्रवर्गांच्या गटातील उमेदवारांच्या गुणांकानुसार विचार केला जाईल.

**११.५ टप्पा पाचवा - सर्व मागास प्रवर्गातील उमेदवारांकरिता:**

चौथा टप्पा पूर्ण झाल्यानंतर मागासवर्गीय उमेदवारांसाठी आरक्षित असलेल्या रिक्त जागांकरिता गुणांकानुसार सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांचा एकत्रितरित्या जागा वाटपासाठी विचार केला जाईल.

**११.६ टप्पा सहावा - अपंग प्रवर्गातील उमेदवारांकरिता:**

पाचवा टप्पा पूर्ण झाल्यानंतर राहिलेल्या रिक्त जागांसाठी उमेदवाराच्या अपंगत्वाच्या गुणांकानुसार अपंग प्रवर्गातील (PWD-१, PWD-२, PWD-३, PWD-४ व PWD-५ एकत्रित) उमेदवारांचा जागा वाटपासाठी विचार केला जाईल.

**११.७ टप्पा सातवा - धार्मिक अल्पसंख्यांक उमेदवारांकरिता:**

सहावा टप्पा पूर्ण झाल्यानंतर रिक्त जागांसाठी इतर अल्पसंख्याक गटामधून त्यांच्या गुणांकानुसार उमेदवारांचा विचार केला जाईल. जर पुरेसे स्त्री उमेदवार उपलब्ध नसतील तर अशा जागा संबंधित धार्मिक अल्पसंख्यांक पुरुष उमेदवारांना दिल्या जातील.

**११.८ टप्पा आठवा - राज्यस्तरीय गुणांकानुसार सर्व आरक्षित उमेदवारांकरिता (मूळ जिल्हा आणि जिल्हाबाह्य जागा एकत्रित करुन):**

मूळ जिल्हा व जिल्हाबाह्य संदर्भ न घेता (खुला/आरक्षित) पात्र उमेदवारांकरिता, फक्त त्यांच्या गुणांकानुसार रिक्त राहिलेल्या जागांवर प्रवेश दिले जातील. सातवा टप्पा पूर्ण झाल्यानंतर रिक्त जागांवर टप्पा १,२,४ व ५ च्या

तुकडीनुसार मूळ जिल्हा व जिल्हाबाहय याचा संदर्भ न घेता फक्त गुणवत्तेनुसार जागा वाटपाचा विचार करण्यात येईल.

११.९ **टप्पा नववा - सर्व राज्यस्तरीय उमेदवारांकरिता फक्त गुणक्रमांकानुसार (कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाशिवाय):**

११.९.१ आठवा टप्पा पूर्ण झाल्यानंतर रिक्त राहिलेल्या जागांसाठी सर्व उमेदवारांचा म्हणजेच खुला/ आरक्षित/ पुरुष/ स्त्री त्यांच्या गुणांकानुसार जागा वाटपाकरिता विचार करण्यात येईल.

११.९.२ वरील टप्प्याकरिता जागेचे बंधन लागू होणार नाही, म्हणजेच उर्वरित रिक्त जागा सामान्य जागा म्हणून समजण्यात येतील आणि उमेदवाराच्या प्रवर्गाचा कोणताही संदर्भ न घेता (खुला/आरक्षित) किंवा रिक्त जागा ज्या संवर्गाशी संबंधित आहे (जसे-मागासवर्गीय, अपंग) यांचा संदर्भ न घेता मूळ जिल्हा आणि जिल्हाबाहय उमेदवारांकरिता असलेल्या रिक्त जागांचे फक्त गुणांकानुसार वाटप केले जाईल.

११.९.३ मूळ जिल्हा, जिल्हाबाह्य, मागासवर्ग, अपंग इ. अथवा उमेदवाराच्या कोणत्याही प्रवर्गाचा व खुला /आरक्षित या बाबींचा संदर्भ न घेता पात्र उमेदवारांना त्यांच्या गुणानुक्रमाचा आधार घेवून सर्व पात्र उमेदवारांकरिता जागा वाटपाचा विचार केला जाईल.

११.९.४ वरील सर्व बाबींची पूर्तता केल्यानंतर जागा रिक्त राहिल्यास महाराष्ट्र राज्याबाहेरील पात्र उमेदवारांच्या गुणवत्तेनुसार त्यांचा जागा वाटपाकरिता विचार केला जाईल. महाराष्ट्र राज्याबाहेरील उमेदवारांना जागा वाटप केल्यानंतरही, जागा रिक्त राहिल्यास, अनिवासी भारतीय रहिवासी उमेदवारांना त्यांच्या गुणवत्तेनुसार जागा वाटप केले जाईल.

१२ **प्रवेश फेरीनुसार जागा वाटपाच्या टप्प्यांची अंमलबजावणी:**

केंद्रीय प्रवेश पध्दती अंतर्गत, जिल्हाबाह्य उमेदवारांकरिता १० टक्के जागा आणि मूळ जिल्ह्याकरिता ९० टक्के जागांचे वाटपासाठी खाली नमूद केलेल्या नियमाप्रमाणे कार्यवाही केली जाईल.

१२.१ केंद्रीय प्रवेश पध्दतीतील पहिल्या फेरीकरिता, टप्पा १ ते ३ मधील नियमांप्रमाणे अंमलबजावणी केली जाईल. काही कारणास्तव जागा भरल्या न गेल्यास अशा उपलब्ध रिक्त जागा केंद्रीय प्रवेश पध्दतीतील दुसऱ्या फेरीमध्ये वाटपास उपलब्ध राहतील.

१२.२ केंद्रीय प्रवेश पध्दतीतील दुसऱ्या फेरीकरिता टप्पा १ ते ७ मधील नियमांप्रमाणे अंमलबजावणी केली जाईल. काही कारणास्तव जागा भरल्या न गेल्यास अशा उपलब्ध रिक्त जागा केंद्रीय प्रवेश पध्दतीतील तिसऱ्या फेरीमध्ये वाटपास उपलब्ध राहतील.

१२.३ केंद्रीय प्रवेश पध्दतीतील तिसऱ्या फेरीकरिता टप्पा १ ते ९ मधील नियमांप्रमाणे अंमलबजावणी केली जाईल. काही कारणास्तव जागा भरल्या न गेल्यास अशा उपलब्ध रिक्त जागा केंद्रीय प्रवेश पध्दतीतील चौथ्या फेरीमध्ये वाटपास उपलब्ध राहतील.

१२.४ केंद्रीय प्रवेश पध्दतीतील चौथ्या फेरीकरिता, फक्त टप्पा ९ मधील नियमांप्रमाणे अंमलबजावणी केली जाईल. टप्पा ९ ची अंमलबजावणी केल्यानंतरही जागा भरल्या न गेल्यास अशा उपलब्ध रिक्त जागा प्रथम महाराष्ट्र राज्याबाहेरील पात्र आणि तदनंतर अनिवासी भारतीय उमेदवारांना देऊ केल्या जातील. यानंतरही भरल्या न गेल्यास अशा उपलब्ध रिक्त जागा, केंद्रीय प्रवेश पध्दतीतील पाचव्या फेरीकरिता वाटपास उपलब्ध असतील (समुपदेशन फेरी)

१२.५ केंद्रीय प्रवेश पध्दतीतील पाचव्या फेरीमधील म्हणजेच जिल्हास्तरीय समुपदेशन फेरीमधील सर्व रिक्त जागा ह्या सामान्य जागा म्हणून समजण्यात येतील आणि राज्य स्तरावरील समुपदेशन केंद्रात म्हणजेच जिल्हास्तरीय शासकीय औ.प्र.संस्थेत उपस्थित असलेल्या उमेदवारांमधून त्यांच्या गुणानुक्रमांकानुसार जागा वाटप केले जाईल.

१२.६ खाजगी औ.प्र.संस्थामधील केंद्रीय प्रवेश पध्दतीतील पाचव्या फेरीनंतर उपलब्ध रिक्त जागा संस्था पातळीवर खाजगी औ.प्र. संस्थांमार्फत प्रवेशाच्या अंतिम दिनांकापूर्वी भरल्या जातील.

१२.७ **सर्वसामान्य सूचना:**

१२.७.१ केंद्रीय प्रवेश पध्दतीमधील प्रथम, द्वितीय, तृतीय आणि चतुर्थ फेरीमध्ये, जिल्हा स्तरावरील गुणवत्ता यादीतील आणि महाराष्ट्र राज्यातील गुणवत्ता यादीतील गुणांकानुसार मूळ जिल्ह्यातील आणि जिल्हाबाह्य जागांकरिता जागा वाटपाची कार्यवाही केली जाईल.

१२.७.२ केंद्रीय प्रवेश पध्दतीतील प्रथम, द्वितीय, तृतीय आणि चतुर्थ फेऱ्यांसाठी त्याच वेळेस उपलब्ध असलेल्या आणि उमेदवाराने भरलेल्या विकल्पांच्या पसंतीक्रमांकानुसार व त्याच्या गुणवत्तेनुसार उमेदवाराला जागा वाटप केले जाईल.

१२.७.३ जर उमेदवार एखाद्या ठराविक टप्प्यामध्ये जागा मिळणेस पात्र असेल तर त्या उमेदवाराचा जरी पूर्वीच्या टप्प्यांमध्ये त्याला जागा दिली असेल, परंतु प्रवेश निश्चित केले नसेल अथवा त्याला जागा दिली नसेल तरीही त्याचा या टप्प्यांत जागा वाटपात विचार करण्यात येईल.

१२.७.४ सर्व टप्प्यामधील जागा वाटपाकरिता सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांना (विशेष मागासप्रवर्ग त्यांच्या मूळ प्रवर्गासह) विचारात घेतले जातील (जरी त्यांना यापूर्वीच्या टप्प्यांमध्ये प्रवेशासाठी जागा दिली असेल (परंतु प्रवेश निश्चित केला नसेल) अथवा नसेल तरीही)

१२.७.५ अनुक्रमाने भरलेल्या पसंतीक्रमानुसार पर्यायामधून प्रथम उपलब्ध पर्यायास प्रवेश मिळाल्यास तीच अंतिम प्रवेशित जागा म्हणून धरण्यात येईल.

१२.७.६ जागा वाटप https://admission.dvet.gov.in या संकेतस्थळावर दर्शविले जाईल. जागा वाटप केलेल्या यादीमधून उमेदवाराला देऊ केलेल्या जागा फक्त तात्पुरत्या स्वरुपात असतील.

१२.७.७ संकेत स्थळावर जागा वाटपाचे पत्र (Allotment Letter) उपलब्ध असेल आणि संबंधित उमेदवाराने त्या पत्राची Print Out प्रवेशासाठी नेमून दिलेल्या संस्थेत प्रवेश निश्चिती वेळी जमा करावी. अर्ज स्वीकृती केंद्र संबंधित उमेदवाराला जागा वाटपाच्या प्रतींची प्रिंट आऊट घेण्यास मदत करेल.

१२.७.८ वर नमूद केलेल्या टप्प्याकरिता सारासार विचार करता, प्रत्यक्ष प्रवेश जागा वाटपाकरिता संगणक Software व्दारे अंमलबजावणी केली जाईल.

१२.७.९ ज्या उमेदवाराला प्रवेश देऊ केला आहे त्याने आपला प्रवेश देऊ केलेल्या संस्थेत स्वत: प्रवेश निश्चितीसाठी आवश्यक मूळ प्रमाणपत्रे सादर करुन व आवश्यक ते शुल्क भरुन यासाठी नेमून दिलेल्या तारखेपूर्वी निश्चित करावा. याकरिता उमेदवारास वैयक्तिकरित्या कळविण्यात येणार नाही.

१२.७.१० कागदपत्रांची छाननी व शुल्क अदा केल्यानंतर संबंधित संस्थेत प्रवेशाची निश्चिती ऑनलाईन करण्यात येईल.

## १३ केंद्रीय प्रवेश पध्दतीचे टप्पे:

### १३.१ टप्पा क्र. I - माहिती पुस्तिका:

१३.१.१ प्रादेशिक कार्यालय निहाय शासकीय आणि खाजगी औ.प्र.संस्थांची यादी व प्रवेशासाठी उपलब्ध व्यवसाय निहाय जागांचा तपशिल https://admission.dvet.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

१३.१.२ माहिती पुस्तिकेमधील माहिती ही सूचकदर्शी आहे. उमेदवाराने अद्ययावत माहितीकरिता संकेत स्थळावर उपलब्ध माहितीशी सत्यता पडताळून पहावी.

### १३.२ टप्पा क्र. II - ऑनलाईन अर्ज भरणे व अर्ज शुल्क जमा करणे:

१३.२.१ सर्व इच्छुक उमेदवारांनी प्रवेशाच्या प्रथम फेरीकरिता https://admission.dvet.gov.in या संकेत स्थळावर विहीत वेळापत्रका नुसार नोंदणी करणे व प्रथम फेरीसाठी विकल्पांच्या पसंती क्रमासह ऑनलाईन अर्ज भरणे आवश्यक आहे.

१३.२.२ ऑनलाईन अर्ज कुठल्याही स्त्रोतामधून भरता येईल. अर्ज स्विकृती केंद्रे ही सुविधा उमेदवाराकडून प्रपत्र - ४ मध्ये नमूद शुल्क आकारुन उपलब्ध करुन देतील.

१३.२.३ सर्व आवश्यक माहिती भरल्यानंतर उमेदवारांचे प्रवेश खाते (Admission Account) त्यांचा नोंदणीक्रमांक (Registration Number) हाच User ID म्हणून तयार होईल. उमेदवारास पुढील प्रवेश प्रक्रियेकरिता या खात्यामध्ये त्याचा नोंदणी क्रमांक व पासवर्ड चा उपयोग करुन प्रवेश ऑनलाईन (Login) करावा लागेल.

१३.२.४ प्रवेश अर्जामध्ये उमेदवाराकडून नोंदवण्यात येणारा प्राथमिक मोबाईल क्रमांक (Primary Mobile Number) हा DGT New Delhi यांच्या स्किल इंडिया डिजिटल हब (SIDH) पोर्टलवर लॉगिन आयडी

म्हणून वापरण्यात येणार असल्यामुळे, हा नंबर औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत सुरू ठेवणे उमेदवारासाठी आवश्यक असणार आहे.

१३.२.५ राज्याबाहेरील व अनिवासी भारतीय उमेदवारांनासुध्दा विहीत कालावधीमध्येच नोंदणी करणे आवश्यक राहील. परंतु त्यांचा विचार प्रवेशाच्या चौथ्या फेरीमध्येच होणार असल्यामुळे त्यांना विहीत वेळापत्रकानुसार चौथ्या फेरीसाठी विकल्प सादर करावे लागतील.

१३.२.६ उमेदवारांनी संपुर्ण प्रवेश अर्ज भरल्यानंतर ऑनलाईन पेमेंट गेटवे च्या माध्यमातुन प्रवेश अर्ज शुल्क जमा करावे.

१३.२.७ प्रवेश अर्ज शुल्क भरल्यावर व प्रवेश अर्ज निश्चित करण्यापूर्वी उमेदवारास प्रवेश अर्जातील माहितीत बदल करता येईल.

१३.२.८ प्रवेश अर्ज निश्चित करण्यासाठी उमेदवाराने प्रवेश अर्जातील माहिती/ दाव्यांच्या पृष्ठ्यर्थ आवश्यक मुळ दस्तऐवज/ कागदपत्रे, कागदपत्रांच्या छायांकीत प्रतींचा (Photocopy) एक संच व तात्पुरत्या प्रवेश अर्जाची छापील प्रत (Print Out) नजिकच्या औ.प्र. संस्थेत पडताळणीसाठी सादर करावेत. प्रवेशासाठी आवश्यक दस्तऐवज/ कागदपत्रांची यादी प्रवेश संकेतस्थळावर Download या मथळ्याखाली तसेच माहिती पुस्तिकेत (प्रपत्र-३) उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

१३.२.९ अर्ज स्विकृती केंद्रामधील अधिकारी हे उमेदवाराने अर्जात नमुद केलेल्या माहितीची उमेदवाराने सादर केलेल्या मूळ दस्ताऐवजावरुन काळजीपूर्वक तपासणी करतील. आवश्यक असल्यास उमेदवारास त्यांनी भरलेली माहिती सादर केलेल्या दस्तऐवज/ कागदपत्रांप्रमाणे दुरुस्त करण्याचे निर्देश देतील. तपासणीनंतर अर्जाचे निश्चितीकरण करुन उमेदवारास “अर्ज निश्चितीकरण पावती” (Application Confirmation Slip) व निश्चित केलेल्या प्रवेश अर्जाची (Confirmed Application Form) प्रत देतील.

१३.२.१० प्रवेश अर्ज निश्चित केल्यावर उमेदवारास प्रवेश अर्जातिल माहितीत बदल करता येणार नाही. तथापि, उमेदवारास प्रवेश अर्जात सादर केलेल्या काही निवडक माहितीत कोणत्याही प्रकारे बदल करावयाचा असल्यास त्यासाठी प्राथमिक गुणवत्ता फेरी नंतर “हरकती नोंदविणे” या फेरीत आपल्या प्रवेश खात्यात प्रवेश (Login) करुन तसा बदल करता येईल. तद्‌नंतर प्रवेश अर्जात कोणत्याही प्रकारे बदल करता येणार नाही.

१३.२.११ ज्या उमेदवारांनी प्रवेश अर्ज निश्चित केलेला आहे त्याच प्रवेश अर्जाचा पुढील प्रवेश प्रक्रीयेसाठी विचार केला जाईल. ज्या उमेदवारांनी प्रवेश अर्ज निश्चित केलेले नसतील असे अर्ज प्राप्तच झाले नाहीत असे समजण्यात येईल.

१३.२.१२ उमेदवाराने फक्त एकच ऑनलाइन अर्ज भरुन सादर करावा जो की केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेमार्फत शिल्पकारागीर प्रशिक्षण योजनेंतर्गत येणाऱ्या कुठल्याही व्यवसायाच्या शासकीय अथवा खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्रवेशाकरिता उपलब्ध होणाऱ्या जागेकरिता भरता येईल.

१३.२.१३ उमेदवारांने एकापेक्षा अधिक अर्ज भरल्यास/ सादर केल्यास त्यास नक्कल अर्ज समजण्यात येईल आणि असे अर्ज उमेदवाराशी कुठल्याही प्रकारे संपर्क न साधता रद्द करण्यात येतील व अशा उमेदवारांना केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेमध्ये प्रवेश घेण्यास प्रतिबंध करण्यांत येईल.

१३.२.१४ ज्या उमेदवारांची खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये संस्था स्तरावरील जागांवर प्रवेश घेण्याची इच्छा आहे त्यांनाही वरील संकेत स्थळावर नोंदणी करावी लागेल व ज्या खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रवेश घ्यावयाचा आहे त्या संस्थेत उमेदवाराने व्यक्तीशः हजर राहून "टप्पा क्र. VI - संबंधित औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये व्यक्तीशः हजर राहून केंद्रीय प्रवेश प्रक्रीया फेरीमध्ये प्रवेशाचे निश्चितीकरण करण्याचे नियम" मध्ये विशद केल्यानुसार प्रवेश प्रक्रीया पूर्ण करावी.

केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेच्या पहिल्या दिवसापासून ते प्रवेशाच्या अंतिम दिनांकापर्यंत खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये संस्था स्तरावरील जागांवर उमेदवारांना प्रवेश घेता येतील.

१३.२.१५ **अर्जशुल्क**

| अ.क्र. | उमेदवाराचा प्रकार | प्रवेशअर्ज शुल्क |
|---|---|---|
| १ | मागासवर्गीय उमेदवार | रु. १००/- |
| २ | सर्वसामान्य उमेदवार | रु. १५०/- |
| ३ | महाराष्ट्र राज्याबाहेरील उमेदवार | रु. ३००/- |
| ४ | अनिवासी भारतीय उमेदवार | रु. ५००/- |

१३.२.१६ ऑनलाईन अर्ज भरणे, प्रिंट आऊट काढणे, गुणवत्ता क्रमांक शोधणे/ जागा वाटपाची यादी शोधणे इत्यादी सेवा अर्ज स्विकृती केंद्रामार्फत उमेदवारांना देण्यात येवू शकतात. तथापि या सेवा पुरविल्याबद्यल प्रपत्र-४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे संबंधित अर्ज स्विकृती केंद्र शुल्क आकारु शकतात.

**१३.३ टप्पा क्र. III - महाराष्ट्रातील, महाराष्ट्र राज्याबाहेरील आणि अनिवासी भारतीय उमेदवारांची तात्पुरती गुणवत्ता यादी प्रसिध्द करणे:**

१३.३.१ महाराष्ट्र राज्यातील, महाराष्ट्र राज्याबाहेरील आणि अनिवासी भारतीय उमेदवारांची नियम क्र. ९.१ नुसार गुणवत्ता क्रमांक दर्शविणारी तात्पुरती गुणवत्ता यादी दिलेल्या वेळापत्रकानुसार सर्व अर्ज स्विकृती केंद्रावर व ऑनलाईन पध्दतीने प्रसिध्द करण्यात येईल.

१३.३.२ उमेदवारास प्रवेश अर्जात सादर केलेल्या माहितीत कोणत्याही प्रकारे बदल करावयाचा असल्यास त्यासाठी प्राथमिक गुणवत्ता फेरी नंतर “हरकती नोंदविणे” या फेरीत आपल्या प्रवेश खात्यात Login करुन तसा बदल करावा. तद्नंतर कोणत्याही प्रकारे प्रवेश अर्जात बदल करता येणार नाही.

१३.३.३ सर्व पात्र उमेदवारांची अंतिम गुणवत्ता यादी विहीत वेळापत्रकानुसार सर्व अर्ज स्विकृती केंद्रावर व ऑनलाईनरीत्या प्रसिध्द करण्यात येईल.

१३.३.४ उमेदवारास त्यांच्या Login व्दारे प्रवेशाची स्थिती, जागा वाटप, सूचना, पुढील प्रवेश फेरी करिताची पात्रता जाणून घेता येईल.

**टिप:** उमेदवारास गुणवत्ता क्रमांक हा त्याच्या संबंधित पात्रतेनुसार प्राप्त झालेला असतो व त्यामुळे त्याची कोणत्याही व्यवसायात प्रवेशाची हमी देता येत नाही.

**१३.४ टप्पा क्र. IV - प्रवेश फेरीसाठी पर्याय देणे:**

१३.४.१ उमेदवारांनी https://admission.dvet.gov.in या संकेत स्थळावर ऑनलाईन प्रवेश अर्ज शुल्क भरल्यानंतर मूळ कागदपत्रांसह नजीकच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये स्वतः उपस्थित राहून प्रवेश अर्ज निश्चित करणे आवश्यक आहे यानंतर उमेदवारास प्रथम फेरीसाठी औ.प्र.संस्था व व्यवसायनिहाय विकल्प व पसंतीक्रम सादर करावे लागतील.

१३.४.२ सर्व पात्र उमेदवारांची अंतिम गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्यात येईल

१३.४.३ उमेदवारास पुढील प्रवेश फेरींकरिता त्याच्या प्रवेश खात्यामध्ये Login करुनच दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या फेरीकरिता विहीत वेळापत्रकानुसार नव्याने विकल्प द्यावे लागतील.

१३.४.४ महाराष्ट्र राज्याबाहेरील आणि अनिवासी भारतीय उमेदवारांना चौथ्या प्रवेश फेरीसाठी चौथ्या फेरीमध्ये द्यावयाचे विकल्प सादर करावयाच्या विहीत वेळापत्रकानुसार द्यावे लागतील.

१३.४.५ प्रथम, दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या प्रवेश फेरीमध्ये नव्याने विकल्प दिल्यानंतर उमेदवारांना कुठल्याही अर्ज स्विकृती केंद्रामध्ये जाऊन अर्ज निश्चितीकरणाची व कुठल्याही प्रकारचे शुल्क भरण्याची आवश्यकता नाही.

१३.४.६ संबंधित फेरीमध्ये विकल्प बदलण्यासाठी दिलेल्या विहीत वेळापत्रकानुसार उमेदवार त्याला वाटेल तितक्या वेळेस त्याच्या Login मधून विकल्प बदलवू शकतो.

१३.४.७ जर उमेदवारास जागा मिळाली नाही व त्याने दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या प्रवेश फेरीकरिता नव्याने विकल्प सादर केले नाही तर उमेदवाराने पूर्वीच्या प्रवेश फेरीमध्ये सादर केलेले विकल्प पुढील प्रवेश फेरीमध्ये विचारात घेण्यात येतील.

१३.४.८ पाचवी व सहावी प्रवेश फेरी म्हणजे समुपदेशन फेरीमध्ये उमेदवारांना त्यांच्या गुणवत्तेनुसार बोलाविण्यात येईल व त्याच्या मागणीनुसार व उपलब्धतेनुसार जागा देण्यात येईल.

**१३.५ टप्पा क्र. V - जागा वाटप करणे (Allotment of Seat):**

१३.५.१ पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या फेरीमध्ये नियम क्र. ११, १२ व १३ नुसार जागा देण्यात येतील.

१३.५.२ जागा वाटपाची यादी विहीत वेळापत्रकानुसार सर्व अर्ज स्विकृती केंद्रावर व ऑनलाईन प्रसिध्द करण्यात येईल.

१३.५.३ जागा मिळालेल्या उमेदवारास जागा मिळाल्याचे पत्र (Allotment Letter) त्याच्या प्रवेश खात्यामध्ये तसेच सर्व अर्ज स्विकृती केंद्रामध्ये उपलब्ध राहील.

**१३.६ टप्पा क्र. VI - संबंधित औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये व्यक्तीश: हजर राहून केंद्रीय प्रवेश प्रक्रीया फेरीमध्ये प्रवेशाचे निश्चितीकरण करण्याचे नियम:**

१३.६.१ जागा मिळालेल्या उमेदवाराने जागा मिळालेल्या पत्राची (Allotment Letter) प्रिंट आऊट काढावी व जागा मिळालेल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत व्यक्तिश: हजर व्हावे.

१३.६.२ सोबतच्या **प्रपत्र-३** मध्ये दिल्यानुसार पात्रतेच्या व आरक्षणानुसार केलेल्या प्रवेश अर्जातील दाव्याच्या पुष्ट्यर्थ उमेदवार सर्व मूळ कागदपत्रे सादर करतील, तसेच सोबत सर्व कागदपत्रांची सत्य प्रतींचा १ संच, २ रंगीत छायाचित्रे (Passport size) आणि प्रशिक्षण शुल्क विहीत कालमर्यादेमध्ये जागा मिळालेल्या औ.प्र.संस्थेमध्ये जमा करेल.

१३.६.३ **प्रपत्र - २** मध्ये औ.प्र.संस्थानिहाय प्रशिक्षण शुल्काचा तपशील देण्यात आला आहे.

१३.६.४ खाजगी औ.प्र.संस्थाकरिता जमा करावयाचे प्रशिक्षण शुल्क खाजगी औ.प्र.संस्थांनी विहीत केलेल्या स्वरुपात (रोख, धनाकर्ष वा धनादेश) भरण्यात यावेत. संबंधित खाजगी औ.प्र.संस्थांच्या परवानगीने प्रशिक्षण शुल्क हप्ते निहाय जमा करता येतील पण शुल्क हप्ते निहाय जमा करण्याचा निर्णय हा संपूर्णत: संबंधित खासगी औ.प्र.संस्थेचा असेल.

१३.६.५ शासकीय औ.प्र.संस्थेकरिता भरावयाचे प्रशिक्षण शुल्क संबंधित शासकीय औ.प्र.संस्थेमध्ये रोखीने एकाच वेळेस जमा करावे.

१३.६.६ उमेदवाराने प्रवेश अर्जामध्ये केलेल्या दाव्यांच्या पुष्ट्यर्थ त्याने जमा केलेल्या सर्व आवश्यक कागदपत्रांची संबंधित औ.प्र.संस्था काळजीपूर्वक छाननी करतील. उमेदवाराचा प्रकार, प्रवर्ग पात्रता इ. च्या दाव्यात अथवा दाव्याच्या पुष्ट्यर्थ सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये काही त्रुटी आढळल्यास त्या संबंधित उमेदवाराच्या नजरेस आणुन देण्यात येतील.

१३.६.७ उमेदवार विहीत वेळापत्रकानुसार नियोजित प्रवेश फेरीकरिता उपलब्ध मुदतीत आवश्यक कागदपत्रे अहवाल सादर करावयाच्या कालमर्यादेमध्ये सादर करु शकतील.

१३.६.८ उमेदवाराने एखाद्या दुसऱ्या संस्थेत प्रवेश घेतल्यामुळे जर तो प्रवेशाच्या वेळेस मूळ कागदपत्रे सादर करु शकत नसेल तर त्याला अशा संस्थेत विशिष्ट दिनांकास विशिष्ट अभ्यासक्रमास प्रवेश घेतला असल्यामुळे त्यांची मूळ कागदपत्रे संस्थेत ठेवण्यात आल्याबाबत त्या संस्थेच्या संस्थांप्रमुखांचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल. उमेदवारास अशा संस्थेच्या संस्थाप्रमुखाने प्रमाणपत्राच्या सत्यापन केलेल्या सत्यप्रती सादर कराव्या लागतील. अशा उमेदवारांना प्रशिक्षण शुल्क प्रवेशाच्या वेळेसच तात्काळ भरावे लागेल आणि अशा उमेदवारांना शुल्क जमा केल्याच्या तारखेपासून ४ कार्यालयीन कामकाजांच्या दिवसांच्या आत कागदपत्रे जमा करण्याची परवानगी देण्यात येईल.

१३.६.९ उमेदवारास प्रवेश विहीत केल्यानंतर संबंधित उमेदवाराचा अंतिम शाळा/ महाविद्यालय सोडल्याचा मूळ दाखला व माध्यमिक शालांन्त प्रमाणपत्र परीक्षा (SSC) गुणपत्रकाची मूळ प्रत संबंधित संस्थेत जमा करुन घेण्यात येईल. एखादया उमेदवाराने संस्थेत अभ्यासक्रमात जर एकदा प्रवेश घेतला तर अशा उमेदवाराने प्रवेश रद्द केल्याशिवाय वा प्रशिक्षण पूर्ण केल्याशिवाय त्याला हा शाळा सोडल्याचा मूळ दाखला व माध्यमिक शालांन्त प्रमाणपत्र परीक्षेच्या गुणपत्रकाची मूळ प्रत परत करण्यात येणार नाही. इतर सर्व प्रमाणपत्रे/ कागदपत्रे प्रवेशाच्या वेळीच मूळ प्रतीवरुन छाननी करुन उमेदवाराला परत करण्यात येतील.

१३.६.१० जे उमेदवार सर्व बाबी पूर्ण करतील त्यांच्यासाठी संबंधित औ.प्र. संस्था दिलेल्या संकेतस्थळावर प्रवेश निश्चितीसाठी आवश्यक ती सर्व प्रक्रिया संस्थेच्या Login मधुन पूर्ण करतील.

१३.६.११ प्रवेश निश्चित करण्याची Online प्रक्रिया झाल्यानंतर शेवटी प्रवेश निश्चित झाल्याचे पत्र पोचपावती (Admission Confirmation Slip) म्हणून ऑनलाईन प्रवेश प्रणालीव्दारे तयार केली जाईल.

१३.६.१२ संबंधित औ.प्र.संस्था पोच पावतीच्या दोन प्रतींची प्रिंटआऊट घेतील. यामधील एक प्रत प्राचार्यांच्या स्वाक्षरीसह संबंधित प्रवेशित उमेदवाराला देण्यात येईल व दुसरी प्रत संस्थेमध्ये ठेवण्यात येईल.

१३.६.१३ ऑनलाईन प्रवेश निश्चिती करणाची प्रक्रिया राबविणे व त्यानुसार उमेदवारांची माहिती अद्ययावत करण्याची जबाबदारी संबंधित औ.प्र.संस्थेच्या प्राचार्यांची राहील. जर दिलेली ऑनलाईन प्रवेश निश्चिती प्रक्रिया पार पाडण्यास संस्था असमर्थ ठरली तर अशा अहवाल अप्राप्त प्रवेशाकरिताच्या जागा पुढील केंद्रीय प्रवेश प्रक्रियेमध्ये भरल्या जातील.

१३.६.१४ जर एखादा उमेदवार प्रवेश देऊ केलेल्या औ.प्र.संस्थेत प्रवेशाकरिता दिलेल्या मुदतीमध्ये संबंधित औ.प्र.संस्थेमध्ये हजर राहून अहवाल सादर करणार नाही तर अशा उमेदवाराचा त्याला वाटप झालेल्या जागेवरील प्रवेशाचा दावा रद्द होईल.

१३.६.१५ अशा प्रकारे रिक्त राहिलेल्या जागा पुढील केंद्रीय प्रवेश प्रक्रियेमध्ये प्रवेशासाठी उपलब्ध केल्या जातील.

### १३.७ टप्पा क्र. VII – पाचवी प्रवेशफेरी – जिल्हास्तरीय समुपदेशन फेरी:

१३.७.१ चौथ्या प्रवेश फेरीनंतर रिक्त राहिलेल्या जागा पाचव्या प्रवेश फेरीकरिता उपलब्ध राहतील.

१३.७.२ माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (SSC) पुरवणी परीक्षेत उत्तीर्ण/अनुत्तीर्ण व अद्यापपर्यंत कोठेही प्रवेश न घेतलेल्या तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रवेशासाठी अर्ज न केलेल्या उमेदवारांसाठी प्रवेशाची संधी उपलब्ध करुन देण्यासाठी पाचव्या प्रवेश फेरीपूर्वी नव्याने अर्ज करण्याची व/वा अर्जात बदल करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल.

१३.७.३ पाचव्या प्रवेश फेरीकरिता उपलब्ध जागांचा तपशील https://admission.dvet.gov.in या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात येईल.

१३.७.४ औ.प्र.संस्थांमध्ये प्रवेशोच्छुक उमेदवारांनी आपल्या प्रवेश खात्यात Login करुन कोणत्याही एका जिल्ह्याच्या समुपदेशन फेरीकरिता दिलेल्या वेळापत्रकानुसार नोंदणी करावी.

१३.७.५ जिल्हास्तरीय समुपदेशन फेरी राबविणाऱ्या शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची यादी प्रपत्र - ५ मध्ये देण्यात येत आहे.

१३.७.६ संगणक प्रणालीव्दारे जिल्हास्तरीय समुपदेशन फेरीसाठी जिल्हा निहाय गुणवत्ता यादी प्रकाशित करण्यात येईल तसेच उमेदवारांना समुपदेशन फेरीसाठी वेळ व दिनांक बहाल करण्यात येईल.

१३.७.७ दिलेल्या वेळ व दिनांकास उमेदवारांना गुणवत्तेनुसार क्रमाने समुपदेशनाकरिता बोलाविण्यात येईल.

१३.७.८ प्रवेशाकरिता उपलब्ध जागा, उमेदवाराची मागणी, उमेदवाराची अर्हता या आधारावर त्या जिल्ह्यातील सर्व शासकीय व खाजगी औ.प्र. संस्थांतिल प्रवेशाच्या जागांचे वाटप करण्यात येईल.

१३.७.९ वाटप झालेल्या जागेकरिता प्रवेश घेण्याची प्रक्रीया संबंधित उमेदवाराने "टप्पा क्र. VI - संबंधित औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये व्यक्तीशः हजर राहून केंद्रीय प्रवेश प्रक्रीया फेरीमध्ये प्रवेशाचे निश्चितीकरण करण्याचे नियम" मध्ये विशद केल्यानुसार निवड पत्रावर (Allotment Letter) दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे पूर्ण करावी.

### १३.८ टप्पा क्र.VIII – संस्था स्तरावरील प्रवेश:

१३.८.१ मुद्दा क्र. १.४ मध्ये नमूद संस्था स्तरावरील प्रवेशासाठी संस्थेत उपलब्ध जागा व पाचव्या प्रवेश फेरीच्या समाप्तीनंतर शिल्लक राहिलेल्या जागा खाजगी औ.प्र.संस्थाना संस्था स्तरावर भरण्यासाठी उपलब्ध राहतील.

१३.८.२ खाजगी औ.प्र.संस्थामधील संस्था स्तरावरील जागांसाठी प्रवेशोच्छुक उमेदवारांना देखील https://admission.dvet.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करावी लागेल.

१३.८.३ नोंदणीकृत उमेदवारांना ज्या खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रवेश घ्यावयाचा आहे त्या संस्थेत उमेदवाराने व्यक्तीशः हजर राहून "टप्पा क्र. VI - संबंधित औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये व्यक्तीशः हजर राहून केंद्रीय प्रवेश प्रक्रीया फेरीमध्ये प्रवेशाचे निश्चितीकरण करण्याचे नियम" मध्ये विशद केल्यानुसार प्रवेश प्रक्रीया पूर्ण करावी.

१३.८.४ केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेच्या पहिल्या दिवसापासून ते प्रवेशाच्या अंतिम दिनांकापर्यंत खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये संस्था स्तरावरील जागांवर उमेदवारांना प्रवेश घेता येतील.

१३.९ **टप्पा क्र. IX – प्रवेशोत्तर कार्यवाही:**

१३.९.१ सर्व औ.प्र.संस्थांनी प्रवेशाची प्रक्रीया प्रवेशाच्या वेळापत्रकामध्ये स्पष्ट केल्यानुसार प्रवेशाच्या अंतिम तारखेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक राहील. अंतिम दिनांकानंतर कोणत्याही प्रवेशास व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत मान्यता दिली जाणार नाही.

१३.९.२ ऑनलाईन प्रवेश निश्चिती प्रक्रीया संकेतस्थळ प्रवेशाच्या अंतिम तारखेस व वेळेस बंद केले जाईल.

१३.९.३ सर्व शासकीय व खाजगी औ.प्र.संस्थांचे प्राचार्य त्यांच्या संस्थेच्या लॉगइनवरुन "Manage Trainee" या पर्यायावरुन प्रवेशित उमेदवारांना तुकडी व पाळी (Shift) बहाल करतील. तसेच स्वाक्षरी व छायाचित्र "Upload Photo with Signature" या पर्यायावरुन प्रवेशाच्या अंतिम दिनांकापासून १५ दिवसांपर्यंत विनाविलंब शुल्क व पुढील १५ दिवसांकरिता विलंब शुल्कासह अपलोड करतील.

१३.९.४ प्रवेश प्रक्रीया पूर्ण झाल्यानंतर औ.प्र.संस्थेचे प्राचार्य प्रवेशित उमेदवारांच्या याद्यांचे व वरीलप्रमाणे "Manage Trainee" बाबत कार्यवाहीच्या प्रिंटआऊट घेतील व त्यावर स्वाक्षरी करुन ती प्रत संबंधित प्रादेशिक कार्यालयास सादर करतील. प्रादेशिक सहसंचालक प्रवेशित उमेदवाराने प्रवेश निश्चिती प्रक्रीयेच्या वेळेस पात्रतेच्या अटींची पूर्तता करतात किंवा नाही याच्या दाव्यापुष्टयर्थ सादर केलेल्या दस्तऐवजांची तपासणी करुन प्रवेशित उमेदवारांच्या याद्यांना अंतिम मंजुरी प्रदान करतील.

१३.९.५ तुकडी/पाळी लागू करणे व स्वाक्षरी व छायाचित्र विहीत मुदतीनंतर अपलोड करण्याकरिता विलंब शुल्क:

| अ.क्र. | तपशील | विलंब शुल्क |
|---|---|---|
| १ | प्रवेशाच्या अंतिम तारखेपासून १५ दिवसांपर्यंत तुकडी व पाळी लागू करणे | रु. ०० |
| २ | प्रवेशाच्या अंतिम तारखेपासून १५ दिवसांपर्यंत स्वाक्षरीत छायाचित्र अपलोड करणे | रु.०० |
| ३ | प्रवेशाच्या अंतिम तारखेपासून १६ वा दिवस ते प्रथम सत्र परीक्षेच्या १५ दिवस अगोदर पर्यंत तुकडी व पाळी लागू करणे | रु. १००/- प्रति दिन प्रति प्रशिक्षणार्थी |
| ४ | प्रवेशाच्या अंतिम तारखेपासून १६ वा दिवस ते प्रथम सत्र परीक्षेच्या १५ दिवस अगोदर पर्यंत स्वाक्षरीत छायाचित्र अपलोड करणे | रु. १००/- प्रति दिन प्रति प्रशिक्षणार्थी |

१३.९.६ प्रवेशित विद्यार्थ्यांकडून विलंब शुल्क जमा करण्यात येणार नसून विलंब शुल्क संबंधित संस्थेच्या प्रवेश प्रमुखांना भरावे लागेल.

**टिप:**

वर नमूद केंद्रीय प्रवेश प्रक्रीया ही सूचक व मार्गदर्शक आहे. प्रवेशाचे वेळापत्रक, अर्ज करण्याची पध्दती, जागावाटप, प्रवेश निश्चिती करणे व इतर संकीर्ण कार्यवाही इ.चा समावेश असलेली प्रवेशाशी व प्रवेशानंतरच्या कार्यवाहीशी संबंधित प्रमाणित कार्यपध्दती (SOP- Standard Operating Procedure) जाहीर केल्याप्रमाणे प्रवेश प्रक्रीयेच्या १५ दिवस अगोदर संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात येईल.

इतर फेऱ्यांमधुन जागा वाटपाची योजना व प्रवेश निश्चिती करण्याचे नियम क्र.१.० ते ४.० याची रचना प्रशिक्षणाची हानी थांबविणे आणि केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेमधील प्रत्येक फेरीच्या व मुख्यत्वे सर्व फेऱ्यांनंतर शिल्लक राहणाऱ्या संचालनालयात उपलब्ध जागांच्या आकडेवारी व वस्तुस्थितीवरुन व संचालनालयाच्या यापूर्वीच्या अनुभवावरुन केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेच्या फेऱ्या औपचारीक व निरुपयोगी न राहता त्यांना अर्थपूर्ण व परिणामकारक करण्यासाठी करण्यात आली आहे.

प्रवेश प्रक्रीयेत पारदर्शकता व सुलभता आणण्याच्या हेतुने, जास्तीत जास्त जागा भरणेकरिता, केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेमधील पूर्वीच्या फेऱ्यांमध्ये जागा वाटप झालेल्या विद्यार्थ्यांनी स्थलांतर केल्यामुळे जागा रिक्त राहू नये म्हणून प्रवेश फेऱ्यांची मांडणी करण्यात आली आहे.

सक्षम अधिकारी आवश्यकता पडल्यास जास्तीत जास्त प्रवेश होतील याची खात्री देण्याकरिता प्रवेश प्रक्रीयेदरम्यान अग्रगण्य वृतपत्रांमध्ये व प्रवेशाच्या संकेतस्थळावर आधीच प्रसिध्द करुन सुधारणा घडवुन आणणारी कार्यवाही करु शकतात.

**१४ मूळ प्रमाणपत्रे ठेवून घेण्याबाबत:**

एखाद्या उमेदवाराला प्रवेश दिल्यानंतर त्यांचा शाळा सोडल्याचा मूळ दाखला व माध्यमिक शालांन्त प्रमाणपत्र (SSC) परीक्षेचे मूळ गुणपत्रक संबंधित संस्थेमध्ये ठेवण्यात यावे. जोपर्यंत उमेदवार प्रवेश रद्द करीत नाही वा प्रशिक्षण पूर्ण करीत नाही तोपर्यंत ही मूळ प्रमाणपत्रे प्रवेश घेतलेल्या प्रशिक्षणार्थ्यांना परत करण्यात येऊ नयेत.

**१५ प्रशिक्षण शुल्क, अनामत रक्कम व सवलत बाबत विवरण:**

१५.१ शासकीय व खाजगी औ.प्र.संस्थांसाठी आकारलेले शुल्क विवरण खालीलप्रमाणे आहे

| अ. क्र. | तपशील | शासकीय औ.प्र.संस्था | | | | | खाजगी औ.प्र.संस्था * | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सामान्य श्रेणी | राखीव श्रेणी | IMC जागा | OMS | NRI | MS | OMS | NRI |
| **वार्षिक प्रशिक्षण शुल्क** | | | | | | | | | |
| १ | प्रशिक्षण शुल्क: मशीन गट - अभियांत्रिकी व्यवसाय | १२०० | - | ३०००० | ४५००० | ६०००० | खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांनिहाय एकत्रित शुल्क तपशिल https://admission.dvet.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे | | |
| | प्रशिक्षण शुल्क: बिगर मशीन गट - अभियांत्रिकी व्यवसाय | १००० | - | २५००० | ३७५०० | ५०००० | | | |
| | प्रशिक्षण शुल्क: बिगर अभियांत्रिकी व्यवसाय | ८०० | - | २०००० | २०००० | ४०००० | | | |
| २ | ओळखपत्र शुल्क | ५० | ५० | ५० | ५० | ५० | | | |
| ३ | ग्रंथालय शुल्क | १०० | १०० | १०० | १०० | १०० | | | |
| ४ | इंटरनेट सुविधा शुल्क | १०० | १०० | १०० | १०० | १०० | | | |
| ५ | सांस्कृतिक कार्य शुल्क | १०० | १०० | १०० | १०० | १०० | | | |
| ६ | वसतीगृह शुल्क | १२०० | १२०० | १२०० | ६००० | १२००० | संबंधित औ. प्र. संस्थांनी निश्चित करावे | | |
| ७ | #सामूहिक अपघात विमा शुल्क | २० | २० | २० | २० | २० | २० | | |
| **प्रवेशाच्यावेळी जमा करावयाची अनामत रक्कम** | | | | | | | | | |
| ७ | प्रशिक्षण अनामत रक्कम | ५०० | ५०० | ५०० | ५०० | ५०० | ५०० | ५०० | ५०० |
| ८ | ग्रंथालय अनामत रक्कम | १०० | १०० | १०० | १०० | १०० | १०० | १०० | १०० |
| ९ | वसतीगृह अनामत रक्कम | १००० | १००० | १००० | १००० | १००० | १००० | १००० | १००० |

#सामूहिक अपघात विमा शुल्क हे वेळोवेळी निश्चित करण्यात येते. सदर शुल्क प्रवेश निश्चित करतेवेळी पेमेंट गेटवेच्या माध्यमातून संचालनालयाचे खाती जमा करण्यात येईल. वरील शुल्कासह पेमेंट गेटवे चे चार्जेस नियमानुसार लागू असतील.

*संबंधित प्रशिक्षण वर्षाकरिता खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांनिहाय एकत्रित शुल्क तपशिल https://admission.dvet.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. खाजगी औ.प्र.संस्थासाठी आकारावयाचे शुल्क निर्धारित केलेल्या शुल्कापेक्षा कमी शुल्क आकारु शकतात. उमेदवारांनी संबंधित खाजगी औ.प्र. संस्थांशी विकल्प सादर करण्यापूर्वी व/वा प्रवेश घेण्यापूर्वी संपर्क करावा.

१५.२ निर्धारीत केलेल्या शुल्कापेक्षा खाजगी औ.प्र.संस्था अधिक शुल्काची मागणी करत असल्यास संबंधित सहसंचालक, प्रादेशिक कार्यालय यांच्या कडे तात्काळ तक्रार करावी. तक्रारीचे निराकरण न झाल्यास सक्षम अधिकारी म्हणजेच संचालक (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांच्या कडे तक्रार करावी.

१५.३ शासकीय औ.प्र.संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षण शुल्कामध्ये तसेच इतर शुल्कात दिली जाणारी सवलत ही राज्यातील रहिवासी असलेल्या व विहीत पात्रता धारक उमेदवारांना दिली जाईल.

१५.४ शासकीय औ.प्र. संस्थेतील संस्था व्यवस्थापन समितीच्या जागा:

१५.४.१ कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, शासन निर्णय क्रमांक : पीपीपी-२०१८/ प्र.क्र.८९/ १८/ व्यशि-५, दि.०६.१०.२०१८ अन्वये केंद्रशासन पुरस्कृत "पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप" योजनेंतर्गत निवड करण्यात आलेल्या शासकीय औ.प्र. संस्थांमधील सर्व व्यवसाय/तुकड्यांमधील २०% जागा ह्या संस्था व्यवस्थापन समितीच्या जागा निर्धारीत करण्यात आलेल्या आहेत.

१५.४.२ प्रशिक्षण वर्ष २०१५-१६ करिता खाजगी औ.प्र.संस्थांसाठी जे मूलभूत प्रशिक्षण शुल्क निर्धारित करण्यात आले आहे, ते प्रशिक्षण शुल्क लागू होईल.

१५.४.३ संबंधित शासकीय औ.प्र.संस्थांच्या संस्था व्यवस्थापन समिती, वरीलपेक्षा कमी फी आकारु शकतात. जर संस्था व्यवस्थापन समितीने कमी फी घेण्याचा निर्णय ठरविला असेल तर तो निर्णय सक्षम अधिकाऱ्याला प्रवेश प्रक्रीया सुरु होण्यापूर्वी कळवावा लागेल.

१५.४.४ सदर औ.प्र.संस्थेतील उर्वरित ८०% जागांसाठी शासकीय औ.प्र.संस्थांकरीता लागू असलेले प्रशिक्षण शुल्क आकारण्यात येईल.

१५.४.५ संस्था व्यवस्थापन समितीच्या २०% जागांवर प्रवेशासाठी इच्छुक उमेदवारांना प्रवेश प्रक्रीयेत स्वतंत्र विकल्प (Option) देण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहे. उदा. Fitter - IMC, Welder - IMC etc.

१५.४.६ सदर २०% जागा ह्या राज्यपातळीवरील सर्वसाधारण जागा असतील व राज्यतील कोणत्याही IMC जागेसाठी उमेदवार विकल्प सादर करु शकतात.

१५.५ अनामत रक्कम प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षणादरम्यान प्रवेश रद्द केल्यास किंवा प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर (काही वजावटी लागू असल्यास त्या वजा करुन) परत केली जाईल.

१५.६ खाजगी औ.प्र.संस्थांचे शुल्क हे संबंधित औ.प्र.संस्थांच्या विहीत अर्जात नमूद केल्याप्रमाणे जमा करण्यात यावे. खाजगी औ.प्र.संस्थांना हप्त्याने शुल्क घेण्याची मुभा/परवानगी आहे. तथापि, यासंबंधीचा निर्णय सर्वतोपरी संबंधित खाजगी औ.प्र.संस्थेचा राहील.

१५.७ **शासकीय औ.प्र.संस्थेचे शुल्क:**

१५.७.१ शासकीय औ.प्र.संस्थेचे शुल्क संबंधित शासकीय औ.प्र.संस्थेत रोखीने जमा करावे. शुल्क अदा केल्यानंतरच प्रवेश निश्चित करण्यात येईल.

१५.७.२ वरीलप्रमाणे शासकीय औ.प्र.संस्थेत प्रशिक्षणार्थ्यांकडुन घेण्यात येणारे प्रशिक्षण शुल्क हे शासन जमा करण्यात येईल. उर्वरीत शुल्क जसे ओळखपत्र शुल्क, ग्रंथालय शुल्क, इंटरनेट सुविधा शुल्क व सांस्कृतिक कार्य शुल्क संबंधित संस्थेच्या स्वीय प्रपंची लेख्यामध्ये जमा करण्यात येईल.

१५.७.३ स्वीय प्रपंची लेख्यामध्ये जमा करण्यात आलेल्या निधीतून खालील बाबींवर खर्च करण्यात येईल.

| अ.क्र. | स्वीय प्रपंची लेख्यामध्ये जमा करण्यात आलेले शुल्क | खर्च करावयाची बाब | खर्चाची टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ओळखपत्र शुल्क | प्रवेशित उमेदवारांना ओळखपत्र देणे | १००% |
| २ | ग्रंथालय शुल्क | अभ्यासक्रमाशी संबंधित पुस्तके/दृकश्राव्य माध्यम खरेदीसाठी | १००% |
| ३ | इंटरनेट सुविधा शुल्क | इंटरनेट सुविधा पुरविणे | १००% |
| ४ | सांस्कृतिक कार्य शुल्क | सांस्कृतिक कार्य/रोजगार मेळावे आयोजित करणे | १००% |

१५.७.४ वरीलप्रमाणे स्वीय प्रपंची लेख्यामध्ये जमा करण्यात आलेला निधी ज्या उद्दिष्टांसाठी जमा करण्यात आलेला आहे त्याच बाबींवर खर्च करण्यात यावा व याची माहिती संस्थेच्या सूचनाफलकावर प्रतिवर्षी दि.१५ एप्रिल पर्यंत जाहिर करण्यात यावी.

**१६ प्रवेश रद्द प्रक्रीया व शुल्क परतावा:**

१६.१ प्रवेशित उमेदवार आपला प्रवेश संबंधित औ.प्र.संस्थेस भेट देवून आपले Login ID वापरुन प्रवेश Online पध्दतीत रद्द करु शकतो. यासाठी संबंधित औ.प्र.संस्था व प्रवेशित उमेदवार दोघांना आपल्या Login ID व्दारे प्रवेश रद्द करावा लागेल.

१६.२ ऑनलाईन प्रवेश प्रणालीच्या माध्यमातूनच प्रवेश रद्द करणे अनिवार्य आहे.

१६.३ प्रवेश रद्द केल्यानंतर प्रणाली ऑनलाईन प्रवेश रद्द केल्याची पावती (Admission Cancellation Note) निर्माण करेल.

१६.४ औ.प्र.संस्था सदर पावतीच्या दोन प्रतीत प्रिंटआऊट घेतील. दोन्ही पावत्यांवर संबंधित औ.प्र.संस्थेचे प्राचार्य व उमेदवार सही करतील.

१६.५ प्रवेश रद्द केलेल्या पावतीची १ प्रत उमेदवाराला देण्यात येईल व दुसरी प्रत संबंधित औ.प्र. संस्थेकडे राखून ठेवण्यात येईल.

१६.६ एखाद्या उमेदवाराने प्रवेशप्रक्रीयेच्या कुठल्याही टप्प्यावर प्रवेश रद्द केला तर तो त्यानंतरच्या प्रवेशफेरीसाठी अपात्र ठरेल. तथापि, असे उमेदवार खाजगी औ.प्र.संस्थेत संस्थास्तरावरील जागांसाठी प्रवेशाच्या अंतिम तारखेपर्यंत पात्र राहील.

१६.७ शुल्क परतावा हा खालीलप्रमाणे प्रवेश रद्द शुल्क कपात करुन दिले जाईल.

| अ. क्र. | परिस्थिती | शासकीय औ.प्र.संस्थेतील उमेदवारांसाठी परतावा | खाजगी औ.प्र.संस्थेतील उमेदवारांसाठी परतावा |
|---|---|---|---|
| १ | प्रवेश रद्द विनंती अर्ज हा चौथ्या प्रवेशफेरीच्या प्रवेश निश्चिती करण्याच्या शेवटच्या दिवशी व वेळेपूर्वी प्राप्त झाला असल्यास | पूर्ण शुल्कातून रु. ५००/- वजा करुन ऊर्वरित रक्कम परत करावी. | पूर्ण शुल्कातून रु. १०००/- वजा करुन ऊर्वरित रक्कम परत करावी. |
| २ | प्रवेश रद्द विनंती अर्ज हा प्रवेशाच्या अंतिम दिनांका नंतर प्राप्त झाले असल्यास व सदर जागा ही संबधित औ.प्र.संस्थेने भरली नसल्यास | अनामत रक्कमेशिवाय कुठलाही परतावा नाही. | अनामत रक्कमेशिवाय कुठलाही परतावा नाही. |

१६.८ उमेदवाराने आपला प्रवेश रद्द केल्यास सामूहिक अपघात विमा शुल्काची रक्कम परत केली जाणार नाही.

**१७ व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना:**

**१७.१ संबंधीत शासन निर्णय:**

१७.१.१ सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागास आणि खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील प्रशिक्षणार्थ्यांना व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपुर्तीचा लाभ देण्यास कौशल्य विकास व उद्योजकता विभाग , -आयटीसी .शासन निर्णय क्र२२१७.क्र.प्र /९९-व्यशि /३, दि.२९.०५.२०१९ अन्वये मान्यता देण्यात आली आहे .

१७.१.२ अनुसुचित जाती प्रवर्गातील प्रशिक्षणार्थ्यांना व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपुर्तीचा लाभ देण्यास सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग-व्यप्रशु .शासन निर्णय क्र ,२०१९.क्र.प्र /१७३-शिक्षण /१, दि.०१.०८.२०१९ अन्वये मान्यता देण्यात आली आहे .

१७.१.३ अनुसुचित जमातीच्या प्रवर्गातील प्रशिक्षणार्थ्यांना व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपुर्तीचा लाभ देण्यास आदिवासी विकास विभाग-आविवि .शासन निर्णय क्र ,२०१९.क्र.प्र /७४-का /१२, दि.२९.०७.२०१९ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

१७.१.४ दिव्यांग प्रवर्गातील प्रशिक्षणार्थ्यांना व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपुर्तीचा लाभ देण्यास कौशल्य विकास व उद्योजकता विभागआय .शासन निर्णय क्र ,टिआय-२०१९.क्र.प्र/५७-व्यशि/३, दि.२०.०९.२०१९ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

१७.१.५ विमुक्त जाती आणि भटक्या जमातीए इतर मागास वर्ग, व विशेष मागास प्रवर्गातील प्रशिक्षणार्थ्यांना व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपुर्तीचा लाभ देण्यास इतर मागास बहुजन कल्याण विभाग, शासन निर्णय क्र. आयटीआय २०१९/प्र.क्र.६८(भाग-१)/शिक्षण, दि. ०२.०८.२०२१ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

**१७.२ पात्रता:**

१७.२.१ शिल्प कारागिर प्रशिक्षण योजनेंतर्गत अभ्यासक्रमांसाठी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप योजनेंतर्गत (पीपीपी) प्रवेशासाठी उपलब्ध जागा व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये प्रवेशासाठी उपलब्ध जागांवर केंद्रीय ऑनलाईन पध्दतीने (Centralized Online Admission Process) प्रवेश घेतलेले प्रशिक्षणार्थी पात्रतेचे इतर निकष पूर्ण करीत असल्यास पात्र आहेत.

१७.२.२ खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये व्यवस्थापन कोट्यातील जागांवर (Management Seats) व संस्थास्तरावर भरण्यात येणाऱ्या जागांवर (Institute Level Seats) प्रवेश घेणारे प्रशिक्षणार्थी सदर योजनेंतर्गत लाभास पात्र नाहीत.

१७.२.३ प्रवेश घेतलेल्या तुकड्यांना राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCVT) अथवा राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषद (SCVT) यांची संलग्नता (Affiliation) आवश्यक आहे.

१७.२.४ प्रशिक्षणार्थ्याने यापूर्वी शासकीय अथवा खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये कोणत्याही अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेला नसावा. म्हणजेच औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रथमच प्रवेश घेणारे प्रशिक्षणार्थी पात्र आहेत.

१७.२.५ प्रशिक्षणार्थ्याने केंद्र अथवा राज्य शासनाच्या अथवा त्यांच्या अधिपत्याखालील स्थानिक प्राधिकरण/ कंपन्या/ महामंडळे यांनी पूरस्कृत केलेल्या कोणत्याही प्रशिक्षण कार्यक्रमांचा या पूर्वी लाभ घेतलेला नसावा.

१७.२.६ प्रशिक्षणार्थी हा महाराष्ट्र राज्याचा अधिवास प्रमाणपत्र धारक असावा.

१७.२.७ योजनेचा लाभ हा कुटुंबातील केवळ २ अपत्यांपर्यत मर्यादित राहील.

**१७.३ योजनेअंतर्गत दिले जाणारे लाभ:**

१७.३.१ सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागास आणि खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दूर्बल घटकातील प्रशिक्षणार्थी ज्यांच्या कुटुंबांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु. २.५० लाखापेक्षा कमी असल्यास त्यांना खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना विहित केलेल्या प्रशिक्षण शुल्कामधून शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील अभ्यासक्रमांसाठी निश्चित केलेले प्रशिक्षण शुल्क वजा जाता उर्वरित प्रशिक्षण शुल्काच्या १०० टक्के इतक्या रक्कमेची व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहील.

१७.३.२ सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागास आणि खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दूर्बल घटकातील प्रशिक्षणार्थी ज्यांच्या कुटुंबांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु. २.५० लाखापेक्षा जास्त व रु. ८ लाखापर्यत असल्यास त्यांना खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना विहित केलेल्या प्रशिक्षण शुल्कामधून शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील अभ्यासक्रमांसाठी निश्चित केलेले प्रशिक्षण शुल्क वजा जाता उर्वरित प्रशिक्षण शुल्काच्या ८० टक्के इतक्या रक्कमेची व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहील.

१७.३.३ इयत्ता १० वी अनुतीर्ण प्रवेश पात्रता असलेल्या व्यवसाय अभ्यासक्रमांत प्रशिक्षण घेणारे अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील प्रशिक्षणार्थी ज्यांच्या कुटुंबांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु. ८ लाखापर्यत आहे व इयत्ता १० वी उत्तीर्ण प्रवेश पात्रता असलेल्या व्यवसाय अभ्यासक्रमांत प्रशिक्षण घेणारे अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील प्रशिक्षणार्थी ज्यांच्या कुटुंबांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु. २.५१ लाख ते रु. ८ लाखापर्यंत असल्यास त्यांना खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना विहित केलेल्या प्रशिक्षण शुल्कामधून शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील अभ्यासक्रमांसाठी निश्चित केलेले प्रशिक्षण शुल्क वजा जाता उर्वरित प्रशिक्षण शुल्काच्या १०० टक्के इतक्या रक्कमेची व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहील.

१७.३.४ इयत्ता १० वी उत्तीर्ण प्रवेश पात्रता असलेल्या व्यवसाय अभ्यासक्रमांत प्रशिक्षण घेणारे अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील प्रशिक्षणार्थी केंद्र शासनाच्या पोस्ट मॅट्रिक स्कॉलरशिप योजनेस पात्र आहेत.

१७.३.५ दिव्यांग प्रवर्गातील प्रशिक्षणार्थीना प्रशिक्षण शुल्काच्या १०० टक्के इतक्या रक्कमेची व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहील.

१७.३.६ विमुक्त जाती आणि भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गातील प्रशिक्षणार्थी ज्यांच्या कुटुंबांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु. ८ लाखापर्यत आहे त्यांना खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना विहित

केलेल्या प्रशिक्षण शुल्कामधून शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील अभ्यासक्रमांसाठी निश्चित केलेले प्रशिक्षण शुल्क वजा जाता उर्वरित प्रशिक्षण शुल्काच्या ८० टक्के इतक्या रक्कमेची व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहील.

| अ.क्र. | प्रशिक्षणार्थ्याचा प्रवर्ग | कुटुंबाचे वार्षिक उपन्न मर्यादा | प्रवेश पात्रता व्यवसाय | व्यवसाय अभ्यासक्रम प्रकार | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | मशीन गट - अभियांत्रिकी | बिगर मशीन गट - अभियांत्रिकी | बिगर अभियांत्रिकी |
| १ | शासकीय औ.प्र. संस्थांसाठी निर्धारित कमाल प्रशिक्षण शुल्क | | | १,२०० | १,००० | ८०० |
| २ | खाजगी औ.प्र. संस्थांसाठी निर्धारित कमाल प्रशिक्षण शुल्क | | | ३०,००० | २५,००० | २०,००० |

| अ.क्र. | प्रशिक्षणार्थ्याचा प्रवर्ग | कुटुंबाचे वार्षिक उपन्न मर्यादा | प्रवेश पात्रता व्यवसाय | व्यवसाय अभ्यासक्रम प्रकार | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | मशीन गट - अभियांत्रिकी | बिगर मशीन गट - अभियांत्रिकी | बिगर अभियांत्रिकी |
| **अनुज्ञेय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती** | | | | | | |
| ३ | सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागास | रु. २.५० लाखापेक्षा कमी | सर्व | २८,८०० | २४,००० | १९,२०० |
| ४ | सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागास | रु. २.५० लाख ते रु. ८ लाख | सर्व | २३,०४० | १९,२०० | १५,३६० |
| ५ | खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल | रु. २.५० लाखापेक्षा कमी | सर्व | २८,८०० | २४,००० | १९,२०० |
| ६ | खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल | रु. २.५० लाख ते रु. ८ लाख | सर्व | २३,०४० | १९,२०० | १५,३६० |
| ७ | अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती | रु. ८.०० लाखापेक्षा कमी | इ.१० वी अनुत्तीर्ण | २८,८०० | २४,००० | १९,२०० |
| ८ | अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती | रु. २.५१ लाख ते रु. ८ लाख | इ.१० वी उत्तीर्ण | २८,८०० | २४,००० | १९,२०० |
| ९ | अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती | रु. २.५० लाखापेक्षा कमी | इ.१० वी उत्तीर्ण | केंद्र शासनाच्या पोस्ट मॅट्रिक स्कॉलरशिप प्रमाणे | | |
| १० | दिव्यांग प्रवर्ग | लागू नाही | सर्व | ३०,००० | २५,००० | २०,००० |
| ११ | विमुक्त जाती आणि भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गातील प्रशिक्षणार्थी | रु. ८.०० लाखापेक्षा कमी | सर्व | २३,०४० | १९,२०० | १५,३६० |

१७.४ **आवश्यक कागदपत्रे:**

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील शिल्पकारागीर प्रशिक्षण योजनेंतर्गत प्रवेश पध्दती, नियमावली व प्रमाणित कार्यपध्दती माहिती पुस्तिकेतील प्रपत्र - ३ “प्रवेशाकरिता आवश्यक कागदपत्रांची यादी” या मध्ये देण्यात आलेले व संबंधीत प्रशिक्षणार्थ्यांच्या प्रवर्गानुसार आवश्यक सर्व कागदपत्रे व त्या व्यतिरिक्त खालील कागदपत्रे आवश्यक आहेत:

१७.४.१ आधार नोंदणी कार्ड

१७.४.२ प्रशिक्षणार्थ्यांचे नाव समाविष्ट असलेले रेशनकार्ड

१७.४.३ महाराष्ट्र अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)

१७.४.४ पालकांचा उत्पन्नाचा दाखला

१७.४.५ जातीचा दाखला

१७.४.६ जात वैधता प्रमाणपत्र - फक्त अनुसुचित जमाती प्रवर्गातील प्रशिक्षणार्थ्यांकरीता लागू

१७.४.७ आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) प्रमाणपत्र - फक्त खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील प्रशिक्षणार्थ्यांकरीता लागू

१७.४.८ दिव्यांग प्रवर्गातिल प्रशिक्षणार्थ्याकरीता वैद्यकीय मंडळाकडून दिलेले अपंगत्वाचे प्रमाणपत्र ज्यात अपंगत्व कायमस्वरुपी असून त्याचे प्रमाण ४०% पेक्षा जास्त आहे असा स्पष्ट उल्लेख आहे.

१७.४.९ पुढील वर्षातील ३१ मार्च पर्यंत वैधता असलेले नॉन क्रिमी लेयर प्रमाणपत्र - विमुक्त जाती आणि भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गातील प्रशिक्षणार्थी

१७.४.१० महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्गा करिता आरक्षण अधिनियम २०२४ च्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने द्यावयाचे जात प्रमाणपत्र आणि पुढील वर्षातील ३१ मार्च पर्यंत वैधता असलेले नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र.

## १८ संकीर्ण:

१८.१ सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये शिल्प कारागीर प्रशिक्षण योजनेच्या अभ्यासक्रमासाठी शिक्षणाचे माध्यम हे मराठी आहे.

१८.२ शारिरीक सक्षमता: प्रवेशित उमेदवारांच्या शारिरीक तंदुरुस्ती पडताळणीसाठी संस्था प्रमुखांनी प्रवेशित उमेदवारांची प्रशिक्षणाच्या आवश्यकतेनुसार तपासणीकरिता वैद्यकीय तपासणी आयोजित करावी.

## १९ वसतीगृहात राहण्याची सोय:

प्रवेशित सर्व उमेदवारांना त्या संस्थेच्या वसतीगृहातील खोल्या मिळतीलच याची शाश्वती नाही. उमेदवाराने देय वसतीगृह शुल्क, इत्यादी गोष्टींबाबत संबंधित औ.प्र.संस्थेच्या प्राचार्याकडून खात्री करुन घ्यावी. प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांना सूचित करण्यात येते की, त्यांना व्यक्तीश: वसतीगृहात राहण्याची व्यवस्था उपलब्ध होऊ शकते किंवा नाही याकरिता ज्या औ.प्र.संस्थेत ते प्रवेश घेऊ इच्छितात तेथील प्राचार्यांशी संपर्क साधावा.

औ.प्र.संस्थेच्या प्राचार्यांनी शारिरीक अपंगत्व असलेल्या उमेदवारांच्या खोली मिळण्यासाठीच्या अर्जांना प्राथमिकता देवून सहानुभूतीपूर्वक विचार करावा. ज्या शासकीय औ.प्र.संस्थांमध्ये वसतीगृहाची व्यवस्था आहे त्या संस्थांची यादी प्रवेश संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

## २० आचरण आणि शिस्त:

२०.१ जर उमेदवार प्रवेश अर्जामध्ये परिपूर्ण व बरोबर विधान करण्यास अपयशी ठरत असेल/काही माहिती दडवत असेल /खोटे कागदपत्र जमा करत असेल तर तो/ती प्रवेशास अपात्र ठरेल. अशा उमेदवारांवर संपूर्ण प्रवेश प्रक्रीयेकरिता बंदी घालण्यात येईल. त्यामुळे उमेदवाराने असाच दावा करावा की, तो सिध्द करण्याच्या पुष्ठ्यर्थ संबंधित मूळ दस्तऐवज आहेत.

२०.२ एखादया औ.प्र.संस्थेत प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण घेताना शासनाने लागू केलेल्या शासनाच्या कायदा व नियमाच्या विरुध्द राष्ट्रविरोधी कृत्य करताना किंवा शिस्तनियमाच्या विरुध्द काही कार्यवाही करताना आढळला तर त्यास संस्थेमधून कुठल्याही सूचनेविना प्राचार्यांमार्फत निलंबित करण्यात येईल व/वा जवळच्या पोलीस ठाण्यास कळविण्यात येईल.

२०.३ प्रशिक्षणार्थ्याने औ.प्र.संस्थेतील सर्व शिस्तविषयी नियमांचे पालन करावे. उमेदवाराने संस्थेने/एनसीव्हीटी/एससीव्हीटी/शासनाने विहीत केलेल्या आचार व शिस्तीच्या नियमांचे उल्लंघन केल्यास, त्याला स्पष्टीकरणाची संधी उपलब्ध करुन दिल्यानंतर संबंधित संस्थेच्या प्राचार्यांना या उमेदवारास निलंबित करण्याचा अधिकार आहे.

२०.४ नियमामध्ये असे असले तरी, शासनाने प्रवेशासंबंधी कोणताही धोरणात्मक निर्णय घेतला असल्यास, शासनाने त्या-त्या वेळेस दिलेल्या निर्देशानुसार तो त्या वेळेपासूनच अंमलात येईल. वेळोवेळी त्यामध्ये बदल केल्यास त्यानुसारच नियमांची अंमलबजावणी केली जाईल.

२०.५ जी समस्या वर आली नाही, ती उदभवल्यास त्याबाबत पूर्ण व अंतिम कार्यवाही सक्षम अधिकाऱ्यामार्फत केली जाईल.

२०.६ अर्जामध्ये नमूद केलेली माहिती किंवा प्रवेशाच्या वेळी किंवा प्रवेशानंतर उमेदवाराने प्रवेशाशी संबंधित दिलेली माहिती खोटी किंवा चुकीची आढळल्यास, त्याचा किंवा तिचा प्रवेश रद्द करण्यात येईल, शुल्क जमा केले जाईल व त्याला किंवा तिला औ.प्र.संस्थेतून प्राचार्यांकडून निलंबित केले जाईल.

२०.७ निलंबन आदेशाविरोधातील अपिल मात्र ७ दिवसांच्या आत संचालक (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना पाठविण्यात येईल व ज्यांचा या प्रकरणातील निर्णय अंतिम राहील.

२०.८ उमेदवाराने परिक्षेस बसण्यास पात्र होण्यासाठी प्रत्येक सत्रामध्ये (सेमिस्टरमध्ये) कमीत कमी ८०% उपस्थिती कायम ठेवावी लागेल.

२१ **रॅगिंग प्रतिबंधाबाबत कार्यवाही:**

**महाराष्ट्र रॅगिंग प्रतिबंध कायदा-१९९९ जो दि.१५ मे, १९९९ पासून लागू झाला आहे त्यात खालील रॅगिंग प्रतिबंध बाबी अंतर्भूत आहेत.**

२१.१ कोणत्याही शैक्षणिक संस्थेच्या आवारात किंवा आवाराबाहेर रॅगिंगला प्रतिबंध करण्यात आला आहे.

२१.२ जो कोणी शैक्षणिक संस्थांच्या आवारात किंवा आवाराबाहेर प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या रॅगिंग करेल/भाग घेईल/साथ देईल/प्रसार करत असेल त्यास २ वर्षे कैद आणि/किंवा दहा हजार रुपयांपर्यंत जाऊ शकतो एवढा दंड आकारण्यात येईल.

२१.३ कुठलाही विद्यार्थी रॅगिंगमध्ये दोषी आढळल्यास त्याची सदर शैक्षणिक संस्थेतून हकालपट्टी केली जाईल व त्यास निलंबित केल्याच्या दिनांकापासून ५ वर्षांसाठी कुठल्याही शैक्षणिक संस्थेत प्रवेशास प्रतिबंध घालण्यात येईल.

२१.४ जेव्हा एखादा विद्यार्थी किंवा परिस्थितीप्रमाणे पालक अथवा त्याला सांभाळणारे अथवा त्या शैक्षणिक संस्थेतील शिक्षक लिखित स्वरुपात छळवणुकीची तक्रार संस्था प्रमुखाला करेल, तेव्हा संबंधित शैक्षणिक संस्थेचा प्रमुख यापूर्वीच्या तरतुदी अबाधित ठेवून, तक्रार आल्यापासून सात दिवसांच्या आत तक्रारीत उल्लेख केलेल्या बाबींची चौकशी करतील आणि जर प्रथमदर्शनी त्या तक्रारीत सत्यता आढळल्यास गुन्ह्याचे आरोप झालेल्या विद्यार्थ्यांला निलंबित करतील आणि त्वरित सदर तक्रार पुढील कार्यवाहीसाठी ज्याठिकाणी शैक्षणिक संस्था आहे त्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या पोलीस स्टेशनमध्ये नोंदवतील. संस्था प्रमुखाकडून केल्या जाणाऱ्या चौकशीमध्ये तक्रारीमध्ये प्रथमदर्शनी तथ्य न आढळल्यास संस्था प्रमुखाकडून तक्रारदाराला लेखी स्वरुपात वस्तुस्थिती कळविली जाईल. या प्रकरणात संस्था प्रमुखांनी घेतलेला निर्णय अंतिम असेल.

२१.५ जर शैक्षणिक संस्थेच्या प्रमुखाने वर २०.४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे रॅगिंगसंबंधी आलेल्या तक्रारीसंबंधी दुर्लक्ष केले असल्यास किंवा ते प्रकरण हाताळण्यात तो अपयशी झाल्याप्रकरणी दोषी आढळल्यास वरील नियम २०.२ प्रमाणे शिक्षेस पात्र धरले जाईल.

२१.६ मा. सर्वोच्च न्यायालयाने वि.अ.याचिका क्रमांक २४२९५/२००६, दि.१६.५.२००७ आणि दिवाणी अपील नं.८८७/२००९, दि.८.५.२००९ यामध्ये दिलेल्या निर्देशानुसार देशातील सर्व उच्च शैक्षणिक संस्थांमध्ये सर्व विद्यार्थ्यांचा शारिरीक व मानसिक, निरोगी विकास प्रदान करणेसाठी अथवा एखादी कृती ज्याचा परिणाम खिल्ली उडविणे, नवीन विद्यार्थ्यांशी अथवा कोणत्या विद्यार्थ्यांशी उध्दटपणे वागणे अथवा हाताळणे, कुठलाही विद्यार्थी किंवा विद्यार्थ्यांकडून नवीन प्रवेशित विद्यार्थ्याला किंवा इतर कुठल्याही विद्यार्थ्याला दंगलखोर वा बेशिस्त कृत्यांमध्ये गोवणे ज्यामुळे त्रास, दु:ख, शारिरीक व मानसिक क्षती झाली असेल अथवा होईल किंवा नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांमध्ये किंवा इतर कुठल्याही विद्यार्थ्यांमध्ये धास्ती, भीती किंवा काळजी निर्माण होईल किंवा कुठल्याही विद्यार्थ्यांस कुठलेही असे कृत्य करावयास लावणे, जो तो सर्वसामान्यरित्या करणार नाही/आणि ज्याचा परिणाम लाजीरवाणी भावना निर्माण होण्यास किंवा यातना होण्यास किंवा गोंधळ निर्माण होण्यास कारणीभूत होईल ज्याचा परिणाम विपरीत अशा नवीन अथवा कुठल्याही विद्यार्थ्यांच्या शारिरीक अथवा मानसिक स्थितीवर होईल. याचा समावेश असलेल्या रॅगींगला कायद्याने प्रतिबंध करण्यात येईल व ही आपत्ती काढून टाकण्यात येईल.

२१.७ **रॅगींग या संकल्पनेमध्ये खालील एक किंवा अधिक बाबींचा समावेश होईल:**

२१.७.१ कुठलाही विद्यार्थी किंवा विद्यार्थ्याकडून नवीन प्रवेशित विद्यार्थ्याला लेखी किंवा इतर कुठल्याही विद्यार्थ्यांला शाब्दिक बोलणे अथवा एखादी कृती ज्याचा परिणाम खिल्ली उडविणे, नवीन विद्यार्थ्यांशी अथवा कोणत्याही विद्यार्थ्यांशी उदध्टपणे वागणे अथवा हाताळणे

२१.७.२ कुठलाही विद्यार्थी किंवा विद्यार्थ्यांकडून नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांला किंवा इतर कुठल्याही विद्यार्थ्याला दंगलखोर वा बेशिस्त कृत्यांमध्ये गोवणे ज्यामुळे त्रास, दु:ख, शारिरीक व मानसिक क्षती झाली असेल अथवा होईल किंवा नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांमध्ये किंवा इतर कुठल्याही विद्यार्थ्यांमध्ये धास्ती, भीती किंवा काळजी निर्माण होईल

२१.७.३ कुठल्याही विद्यार्थ्यांस कुठलेही असे कृत्य करावयास लावणे जो तो सर्वसामान्यरित्या करणार नाही / आणि ज्याचा परिणाम लाजिरवाणी भावना निर्माण होण्यास किंवा यातना होण्यास, किंवा गोंधळ निर्माण होण्यास कारणीभूत होईल ज्याचा परिणाम विपरीत अशा नवीन अथवा कुठल्याही विद्यार्थ्यांच्या शारिरीक अथवा मानसिक स्थितीवर होईल.

२१.७.४ वरिष्ठ विद्यार्थ्यांकडून अशी कृती की जी नवीन अथवा कुठल्याही विद्यार्थ्यांच्या नियमित प्रशिक्षणामध्ये बाधा, अडथळा अथवा प्रतिबंध निर्माण करेल.

२१.७.५ नवीन अथवा कुठल्याही विद्यार्थ्यांची सेवा वैयक्तिक अथवा विद्यार्थ्यांच्या गटाचे प्रशिक्षणाच्या कार्यासाठी घेऊन शोषण करेल.

२१.७.६ विद्यार्थ्यांतर्फे नवीन अथवा कुठल्याही विद्यार्थ्यांची आर्थिक पिळवणूक किंवा जबरदस्तीने खर्चाचा भार टाकणे.

२१.७.७ शारिरीक शोषणाचे कुठलेही कृत्य ज्यामध्ये लैंगिक शोषण, समलैगिंक शोषण, नग्नता, अश्लील हावभाव, असभ्य कृती करावयास लावणे, शारिरीक इजा पोहचविणे किंवा व्यक्ती अथवा आरोग्यास धोका संभावणारे सर्व प्रकार सामील आहेत.

२१.७.८ अश्लील शिवीगाळव्दारे, मेलव्दारे, टपालाव्दारे नवीन तथा इतर कुठल्याही विद्यार्थ्यांची प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे फसगत किंवा दुसऱ्याची नक्कल किंवा दुसऱ्याचा अपमान करणारी कुठलीही कृती.

२१.७.९ विकृत आनंद मिळण्याच्या किंवा सामर्थ्य/अधिकार व वरिष्ठपणा दाखविण्याच्या उद्देश असो अथवा नसो अशी विद्यार्थ्याने केलेली कुठलीही कृती ज्याचा नवीन अथवा इतर कुठलीही की ज्यामुळे विद्यार्थ्याच्या मानसिक स्थिती व आत्मविश्वासावर परिणाम होईल

२१.८ **औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील रॅगींग करणाऱ्या व प्रोत्साहन देण्याच्या विद्यार्थ्यांविरुध्द कार्यवाहीबाबत:**

२०.८.१ रॅगींग करणाऱ्या व्यक्तीस होणारी शिक्षा ही जरब बसविल अशी व कठोर असावी ज्यामुळे अशा प्रकाराची पुनरावृत्ती होण्यास प्रतिबंध लागेल.

२०.८.२ रॅगींग च्या प्रत्येक घटनांची संस्थेच्या अधिकाऱ्यांमार्फत जवळच्या पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंद केली पाहिजे.

२०.८.३ रॅगींगच्या शिक्षेशी संबंधित किंवा रॅगींगच्या प्रत्येक घटनेतील तथ्यावर आधारीत व रॅगींगच्या घटनेचा प्रकार व तीव्रता बघून संस्थेची रॅगींग विरोधी समिती योग्य निर्णय घेईल.

२०.८.४ घडलेल्या गुन्ह्याचा प्रकार व तीव्रता बघून संस्थास्तरावर दोषी आढळलेल्या विद्यार्थ्यास व्यक्तीस खालीलपैकी एक किंवा एकापेक्षा जास्त एकत्रित शिक्षा होईल.

२०.८.४.१ प्रवेश रद्द करणे

२०.८.४.२ वर्गातील उपस्थितीपासून निलंबित करणे

२०.८.४.३ शिष्यवृत्ती/फेलोशिप/इतर सवलतीपासून वंचित करणे/रोखून धरणे

२०.८.४.४ परीक्षा व/वा इतर मूल्यांकन प्रक्रीयेतील सहभागास प्रतिबंध करणे

२०.८.४.५ निकाल रोखून धरणे

२०.८.४.६ कोणत्याही विभागीय, राष्ट्रीय, आंतरराष्टीय स्पर्धेचे, युवा उत्सवाचे संस्थेचे प्रतिनिधीत्व करण्यापासून हद्दपार करणे

२०.८.४.७ वसतीगृहातून निलंबित करणे/हकालपटटी करणे.

२०.८.४.८ संस्थेमधून ठराविक कालावधीकरिता विद्यार्थ्यांला तात्पुरते काढून टाकणे.

२०.८.४.९ संस्थेमधून हकालपट्टी आणि दुसऱ्या कोणत्याही संस्थेत प्रवेशास बंदी घालणे.

२०.८.४.१० सामुहिक शिक्षा: जेव्हा रॅगींग चा गुन्हा करणारा वा प्रोत्साहन देणाऱ्याची ओळख पटणार नाही तेव्हा संस्था संभावित रॅगींग करणाऱ्यांवर सामाजिक दबाव आणण्यास सामुहिक शिक्षा करेल.

२२ **हमीपत्र:**

सर्व उमेदवार ज्यांनी प्रवेशासाठी Online अर्ज केलेले आहेत ते खालीलप्रमाणे हमीपत्र भरुन देत आाहेत असे समजण्यात येईल.

२२.१ मी प्रवेशाचे सर्व नियम वाचले आणि सदर नियमांचे मला पूर्णपणे आकलन झाले आहे व तदनंतर मी चालू वर्षाच्या प्रवेशाकरिता ऑनलाईन अर्ज भरला आहे.

२२.२ माझ्या ऑनलाईन प्रवेश अर्जात माझ्याकडून दिली गेलेली माहिती ही माझ्या माहितीनुसार व विश्वासाप्रमाणे खरी असून प्रवेश अर्जात दिलेली माहिती किंवा माझ्या प्रवेशाबाबत मी पुरविलेली माहिती नंतर किंवा कुठल्याही वेळेस

खोटी किंवा चुकीची सिध्द झाल्यास त्याचवेळेस माझा प्रवेश रद्द होईल व मला प्राचार्यांकडून निलंबित करण्यात येईल, याची मला जाणीव आहे.

२२.३ भारतीय सरकारतर्फे गठीत किंवा वैधानिक परीक्षा मंडळाच्या परीक्षेस बसण्यास मला बंदी घालण्यात आलेली नाही.

२२.४ मला माझ्या अर्जाच्या छाननीच्या वेळेस उपलब्ध व्यवसाय व माझ्या गुणवत्तेच्या क्रमानुसार प्रवेशासाठी जागा मिळणार आहे याची मला जाणीव राहील. मी प्रवेश निश्चितीसाठी निवड झालेल्या औ.प्र.संस्थेत विहीत वेळापत्रकानुसार उपस्थित राहून ऑनलाईन प्रवेश प्रक्रीया पूर्ण करेन.

२२.५ मला माहित आहे की, कागदपत्रे जमा करण्याच्या शेवटच्या तारखेनंतर माझ्या प्रवेशाशी संबंधित नियमात उल्लेख असल्याशिवाय मला सवलती वा हक्क इ. च्या दाव्याप्रित्यर्थ कागदपत्रे सादर करता येणार नाहीत.

२२.६ प्रवेशासंबंधी मला प्रवेश प्राधिकरण किंवा प्रतिनिधीकडून काहीही पत्रव्यवहार केला जाणार नाही याची मला जाणीव आहे. मी हेही जाणून आहे की, संस्थेमध्ये मी स्वत: जावून संस्थेतील सूचना फलकावरील वा https://admission.dvet.gov.in या संकेतस्थळावरील सूचना पाहणे ही पूर्णपणे माझी जबाबदारी राहील.

२२.७ मला माहित आहे की, NCVT/SCVT च्या परीक्षा प्राधिकरणाने ठरवून दिलेल्या परीक्षेसंबंधी परिक्षेस बसण्याच्या संधी, प्रत्येक सेमिस्टरसाठी कमीत कमी उपस्थिती, नकारात्मक गुणपध्दती व असे इतर नियम जे NCVT/SCVT यांनी वेळोवेळी ठरवून दिलेले आहेत त्या नियमांना मी बांधील राहीन.

२२.८ मी ह्यानुसार मान्य करतो की शासनाकडून लागू करण्यात आलेले नियम, कायदा आणि प्रशासन माझ्यावर बंधनकारक असतील. मी ह्यानुसार हमी देत आहे की, संस्थेच्या आवारात किंवा आवाराबाहेर कायदा व प्रशासन हातात घेणार नाही तसेच बेशिस्तपणाची कोणतीही वर्तणूक करणार नाही की ज्यामुळे माझ्यावर या नियमातील शिस्तविषयक शिक्षा होईल.

२२.९ मी वर हमी दिल्याप्रमाणे संस्था/शासन/SCVT/NCVT यांनी ठरवून दिलेली शिस्त व वर्तणूक बाबतच्या नियमांचे माझ्याकडून उल्लंघन झाल्यास संस्थेच्या प्राचार्यांना मला संस्थेतून निलंबित करण्याचे पूर्ण अधिकार राहतील.

२२.१० प्रत्येक सत्रासाठी सैध्दांतिक व प्रात्यक्षिक परीक्षेसाठी सैध्दांतिक व प्रात्यक्षिक वर्गांमध्ये ८० टक्के पेक्षा कमी उपस्थिती असल्यास मला परीक्षेस बसू दिले जाणार नाही या अटीची मला पूर्णपणे जाणीव आहे.

२२.११ NCVT/SCVT यांनी नेमून दिलेल्या विहीत वेळेत गृहपाठ, जॉब, जर्नल्स, चित्रकला इ. सादरीकरण समाधानकारकरित्या करण्यास असमर्थ ठरल्यास परीक्षेस बसण्यास परवानगी दिली जाणार नाही याची मला पूर्ण जाणीव आहे.

## २३ प्रशिक्षणार्थ्याची बदली:

२३.१ संपूर्ण प्रवेश प्रक्रीयेनंतर एखादया व्यवसायात/तुकडीत ५०% पेक्षा कमी प्रवेश झाल्यास प्रवेशित उमेदवारास त्याच औ.प्र.संस्थेत दुसऱ्या व्यवसाय/अभ्यासक्रमात किंवा इतर औ.प्र.संस्थेत त्याच व्यवसाय अभ्यासक्रमात बदली करुन दिली जाईल. अशी औ.प्र.संस्था प्रथमत: त्याच जिल्ह्यात, त्याच विभागात, त्याच विभागाच्या जवळपासच्या विभागात असली पाहिजे. अशा बदलीकरिता उमेदवाराचे प्राधान्य विचारात घेतले जाईल. अशा प्रकारची बदली शासकीय औ.प्र.संस्थांवर बंधनकारक व खाजगी औ.प्र.संस्थाना ऐच्छिक राहील.

२३.२ प्रथम वर्ष परीक्षेपूर्वी वर उल्लेखिलेल्या नियम २२.१ व्यतिरिक्त बदलीसाठी परवानगी दिली जाणार नाही.